
# कादोडी

नाताळ २५ डिसेंबर २०१५

चौथा वहरी पयलॉ अंक

खाजगी वितरन



# कादोडी

चौथा वहरी पयलॉ अंक

एकून दहावॉ अंक

खाजगी वितरन

**अंकायॅ पैशॅ**
**दा रुपय**

## नाताळश्या हनाव विशेषांक

**२५ डिसेंबर २०१५**

## या अंकात .......


संपादकीय
बिशप अंब्रोज रिबेलो
बिस साल बाद - सिरील मिनेझिस
बाबुकाकाई सोपडी... सचिन रॉड्रिग्ज
कुपारी तडका – सचिन मेंडिस
कविता - बोयला गा हांगातॅ - सॅबी परेरा
कविता - माऑ शानो बाबा - पास्कोल कोरिया
कॉलेजशी आठोन – रोशल मेन
पाशीहार - वेरोनिका लोपीस
मॅ कुन हाय...? – फ्रँक मिरांडा
अंद्रया, फुला आण भयदिवाड !! - सिमसन पहरावकर
भाषा आन म्ये - निलेश डायस
भाटात्सा भूत ! तॅआ मायशी... - बर्नर्ड लोपीस
राट एक जीवन गानो ... - आलेक्स मच्याडो
कविता - प्रेम गीत - डॅनिअल मस्करणीस
पाणी वासवा जीवन जगवा - सेलविन रॉड्रिग्ज


**संपर्क / अभिप्राय :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान किंवा आपलॉ या अंकाविषयी अभिप्राय, तुमाला का आवडला, का नाय ता आमाला जरूर कळवा. बाजूला दिलेल्या ई-मेल आयडीवर ई-मेल करा किंवा संपादक मंडळाश्या कुनालाही फोन करा.


**संपादक**

ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८)

**सहसंपादक**

एडवर्ड डिसोजा

**संपादक मंडळ**

सायमन रॉड्रिग्ज
सुनील डिमेलो
डॅनियल मस्करणीस
राजन डिमेलो
जेम्सन डिमेलो
रॉबर्ट फर्नांडिस
रॉबिन्सन डिमेलो
वॉल्टर तुस्कानो

**मुखपृष्ठ :-** पॉल डिमेलो, गास

**Email :-** kadodivasai@gmail.com

**Web :-** www.onevasai.com

**मुद्रक :-** मॅन्युएल प्रिंट, वसई पूर्व – ९७६५८७४४९३


**सूचना:-** 'कादोडी' या अंकाव अकरावॉ अंक ईस्टरश्या हनादिहा, २७ मार्चला प्रकाशित होनार. या अंकात तुमाला लेख, कविता आहा कय साहित्य द्यासा हायदॅ ते ०८ मार्चपोत **kadodivasai@gmail.com** मेल करा किंवा संपादक मंडळाला संपर्क करा.

जकलॅ जाहिरातदार, देनगीदार तहॅस चांगल्यो सूचना-अभिप्राय देनाऱ्या जकल्या कुपारी लॉकांअॅ आमॅ खूप आभारी हाव.
**नाताळसॉ हन जकल्या वाचकांना खुब आनंदाव आन मजॅऑ जाओ अह्यो शुभेच्छा.**


**या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदॅस आहा नाय.**

# संपादकीय

२०१२ ईस्टरश्या हनापासून आपुन आपल्या कुपारी समाजाई, आपली भाषा ‘कादोडी’ या नावाने यॉ अंक सालू कॅलॉ, आज चौथा वहरी सुरु जालॅ, मिनॅस आमाला वाटला की लेख-कविता कय आला नाय तॅ अंक काड्यासॉ बंद कऱ्या लागॅदॅ गा का? पान नाय ... २०१२ पासून आपल्या समाजात या अंकामुळॅ एक जही नवीन क्रांती घडली, कारन यॉ अंक प्रकाशित झाल्योर त्या वहरापासुन “बारा आने बाटली जाम काम” या आपल्या बोलीभाषेतश्या आजवरश्या पयल्या नाटकाव ३५ वहरानंतर परत एकदा प्रयोग झालॉ. “कुपारी संस्कृती मंडळ” स्थापन झाला, त्याद्वारे पयलो वयलो “कुपारी महोत्सव” साजरॉ झालॉ. “हाऊ ओऊसा तळा” या नवीन नाटका खेळाला सुरुवात जाली. आपल्या पोरांबरोबर मराठी बोलनारॅ लोक त्याबरोबर आपल्या भाषेत बॉल्या लागल्ये. आपली तरुन पिढी जी आपलॉ पारंपारिक पोशाख जवळजवळ बाहालतॅ (विहारलोतॅ) ते वॅगवॅगळ्या कार्यक्रमानिमितान घाल्या लागले. आमसॉ मित्र, सिरील मिनेझीसन्ये तर पयलॉ कादोडी विनोदी कथासंग्रह प्रकाशित कॅलॉ. त्या हातन्ये बी अहेस पुस्तके येवो अही त्याला शुभेच्छा.

या अंकाला पान तुम्ये भरभरोन साथ दिली, आपल्या कुपारी समाजाश्या १३ पॅरीशश्ये जवळजवळ ८ हजार कुटुंबॅ हात, त्या बहुतेक घरा यॉ अंक पॉसलॉ. ज्यांना शक्य होता त्यायी इंटरनेटवरन्ये प्रिंट काडॉन हाडॉन आपल्या घरश्यांना आन मॅरदारश्या लोकांना वाश्या दिलॉ. तुमसा आहास प्रेम या अंकोर ठवा मंज्ये आमाला पुढॅ अंक काडीत ऱ्यादो बारा वाटॅदॅ. बी मंज्ये आपला लोक आपल्या भाषेत लिव्या लागला. आर्तॅपोत प्रत्येक अंकात आमाला आपल्या भाषेत लिवनारॉ कुन ना कुन नवीन भॅटातॅस. आपली भाषा टिकवॉन ठव्यादो त्यामुळॅ मदत हॉनार हाय. तुम्ये लीवितॅ ऱ्या आन या अंकात प्रकाशित कऱ्या धाडीत ऱ्या. आपल्या जुन्या माहनादरी जुन्या ‘कानी’सॉ खुब स्टॉक हाय, आपल्यापैकी कुन्ये त्यादरन्ये बॉलॉन लीवॉन घेतल्यो आन आमाला या अंकात द्यादो धाडल्यो ते आपल्याला आपलॉ यॉ खजिनॉ नक्कीस जपॉन ठवता येदॅ, नाय तॅ लाल लुगडा आन कब्जा-तांबडी टोपी कमी हॉत साल्ली तही यी ‘कानी’शी खान पान आटात जायदॅ.

बी एक वॅगळॉ मुद्दॉ मांड्यासॉ हाय, ई वहरी एका वॅगळयास कारनाकरिता आपुन सगळयाई लक्षात ठविला पाय. या वहरात आपल्या वसयमिनश्ये खूप तरुन अकाली दॅवाघारा गॅलॅ आन सगळयात धोकादायक मिन्ज्ये यात हार्ट-अटॅकनॅ गॅलॅल्याआ प्रमान खूप जास्ती हॉता. ई बाब आपल्या सगळ्याकरतान खूप धोकादायक हाय. अमेरिकेत सत्तर-ऐशीश्या दशकात अचानक हृदयविकारान्ये मरनाऱ्याई संख्या जाम वाढली. या मांग्ये महत्वा कारन हॉता, ता मंज्ये,  'कार-मॉल-टीव्ही' अही तडॅ आलेली सुबत्ता. कारमिन्ये भॅवॉन ऑफीसला जासा, तडन्ये येताना मॉलमिन्सा जा पाय ता हाड्यासा आन घारा आल्योर टीव्ही बगीत भ्यासा, अही ती लाईफस्टाईल होती. शरीराला कईस व्यायाम नॉतॉ. पन ते अचानक व्यायामाबाबतीत खूप काळजी घ्या लागल्ये, आज अमेरिकन महानु व्यायामाला खुब महत्त्व देत्ये. आज आपल्या वसईमिन्ये पन तीस परिस्थिती हाय. आयटी, शिप मुळॅ पैसो खूप आल्ये, आन सगळा जडश्या तडे मिळया लागल्यामुळॅ आपल्या शरीराई हालसाल कमी जाल्ये. कामामुळॅ व्यायाम करयादो वेळ नाय, आन जिभ्योरपन आपलॉ ताबॉ नाय, अह्या परीस्थितीत आपला हृदय कहा व्यवस्थित रॅदॅ बरा? पन आत्ये कंटाळॉ करॉन सल्यासॉ नाय. रॉज कमीत कमी अर्धॉ तास व्यायाम जालॉस पाय. मटन कमी कॅलास पाय. भाजीपालॉ, फळे या वापर आपुन वाडविलॉस पाय. लग्नाऑ सीजन सुरु जाल्ये, पण आपल्या जिभ्योर आपुन ताबॉ ठविलॉ पाय.

भाशा टिकली त्ये समाज टिकॅदॅ आन समाज टिकलॉ तरुस संस्कृती टिकॅदॅ... भगून आपला जकल्यात पयला काम भाशा टिकवना ई अहला पाय.

# अस्साल कुपारी बिशप अंब्रोज रिबेलो

१३ मे शी गर्मीयी दोपार वसयमिनन्ये एक खुषीयी बातमी घिती आली, आपल्या कुपारी समाजासॉ, सॉकाळसॉ फादर अंब्रोज रिबेलो यांशी औरंगाबाद धर्मप्रांताश्ये बिशप मनून नेमणूक झाल्यायी बातमी व्हॅटिकन रेडिओवरन्ये प्रसारित झाली आन आपल्या परिसरात आनंदाला उधान आला. बिशपांश्या निवडीन्ये आपल्या समाजाऑ अभिमान वाढलॉ.

१७ फेब्रुवारी १९४९ ला पिटर आन जॉना रिबेलो यांश्या कुटुंबात बिशप अंब्रोज यांसॉ जन्म झालॉ. ३ बेंनी आन ५ बाहा मिन्ये त्यांव सव्वो नंबर. निर्मळश्या होली क्रॉस हायस्कूल मिन्ये आन नंतर नागपूरला अपॉस्टोलिक स्कूल आडे त्यान्सा शिक्षान झाला. जून १९७१ मिन्ये त्यायी नागपूरलास सेंट चार्ल्स रिजनल सेमिनरीत प्रवेश घॅतलॉ. २२ एप्रिल १९७९ या दिहा होली क्रॉस चर्च, निर्मळला औरंगाबाद धर्मप्रांतासॉ  तिगाळसॉ बिशप ख्रि. डॉमणिक आब्रिओ ह्यांश्या दरन्ये त्यांना ओडदी मिळाली. त्यावेळश्या एकत्र निर्मळ पॅरीशसॉ ते पयलॅ फादर हॉतॅ. औरंगाबादश्या माळीघोघरगाव, बोरसर, रघुनाथनगर, पूर्णा आन वैजापूर या पॅरीशमिन्ये त्यायी कार्य केला. त्यासबरबर २०११ पासून विकर जनरल, चॅन्सलर, धर्मप्रांतीय पाळकीय केंद्राऑ संचालक आन धर्मप्रांतीय शिक्षण विभागाऑ संचालक अहयो वेगवेगळयो जबाबदाऱ्यो त्यायी हांबाळल्यो.

बिशप डॉमणिक आब्रिओ, बिशप इग्नेशियस डिकुना, बिशप सिल्वेस्टर मॉन्टेरो व बिशप एडविन कोलॅसो यांनंतर ते औरंगाबाद धर्मप्रांताये पासवॅ बिशप हात आन आपल्या वसई धर्मप्रांतातन्ये झालॅलॅ ते सातवॅ बिशप हात. २८ ऑगस्ट २०१५ ला औरंगाबादला त्यांना बिशपपदायी ओडदी मिळाली. २९ नोव्हेंबरला त्यांश्या गोम्सआळी पॅरीशन्ये त्यान्सॉ सत्कार कॅलॉ, त्यावेळेला त्यांश्या बरबर बॉल्या मिळाला, बिशपसायबाई आपला आख्खा संभाषन आपल्या कादोडी भाषेमिन्ये केला यी विशेष,  ता संभाषन त्यान्श्यास शब्दात...

म्ये अस्सल कुपारी मातीत वाढलेलो बिशप हाय. आपली कुपारी संस्कृती आन आपलॉ समाज सगळयांना बरोबर घॅवॉन जानारॉ हाय, कारन आपुन एकत्र कुटुंबपद्धतीत वाढलेले हात. आमसा रिबेलो कुटुंब आत्ये आख्या गावात विखुरल्ये पान तिगाळा १० कुटुंबे एका घरात रेतॉते.  ३०-४० वहारापूर्वीशी आपल्या कुटुंबाई रचना आपल्याला खुब कय हांगॉन जात्ये. आज आपलॅ दरवाजॅ एकमेकाकरता बंद जाल्यात पान तिगाळा कुडा फटीतन्ये आपुन बोयले, मॅरश्या कुटुंबात सुलीओर का हिजल्ये ता बगीला, तडनॅस एकमेकायी गरज भागविली, तेल, मशालो, हाकर-भुखी खुटली ती दिली. एकत्र प्रार्थना केली, तिगाळा आम्ये पोरे पिंड्योर पिंडा ठवॉन त्यावर मावली ठवॉन तियी प्रार्थना कऱ्याश्ये, मग आमश्या मार्गॅ आखा लोक जमा हॉव्यासा. कुपारी समाज आन त्यायी कुटुंबरचना माला खुब खुब भावोन जात्ये.

आपल्या कादोडी भाषेविषयी बोल्यासा मंज्ये, माला दुहरॉ कुपारी माहनू भॅटलॉ आन तॉ कॉडॉही हिकलॅलॉ अहलॉ तरी म्ये त्या हरी आपल्या भाषेतूस बॉलात्ये, बिशप थॉमस डाबरेला कात्ये फोन कॅलॉ गा, 'कहॉ हा, बरॉ हा गा' अही आमशी सुरवात हॉवात्ये. बिशप एडविन कोलासो मूळसॉ कोळी हॉवॉनसुद्धा मा बरबर आपली भाषा बॉल्यासॉ प्रयत्न करत्ये. आपली भाषा दिख्यादॉ कुन्ये गावंढळ हांगिली तरी ती खुब सोयीशी भाषा हाय.

मराठवाड्याहारक्या ठिकानी ५० वहरॅ जालॅ काम करताना आन तडश्या मराठी भाषेमिन्ये बोलताना आजश्या पिढीपेक्षाही चांगली भाषा बॉल्यादॉ तुमाला कही जमात्ये आहा विसारल्योर बिशप बॉयले की ई भाषा मा रक्तात भिनल्ये, कळया लागताबरोबर जी भाषा मा जिब्योर आल्ये ती अही कही म्ये भाहू (विहरू) शकात्ये, माला अजूनही आपल्या लोकात म्ये बोलात असताना जुन्ये जोक हांग्यादो आवडात्ये. माला आपल्ये बोतेक सगळॅस कुपारी गान्ये आवडात्यात आन खाण्यामिन्ये आवडता आपला अस्साल कुपारी पकवान मंज्ये दोदाल, ता गराम गराम खादो आणखीनुस मजा येत्ये.

आजशी औरंगाबाद ग्रामीन भागाशी परिस्थिती आपल्या ३०-४० वहारा अगोदरश्या परिस्थिती हारकीस हाय, त्यात तडे पाणी कमी पडात्ये त्यामुळॅ दुष्काळाई परिस्थिती, तरी पान तडश्या पोरांना आपल्या परिस्थितीयी जानीव हाय. आपल्या पोरांना आत्ये बटन दाबीला गा सगळा मिळात्ये, तडे शिक्षणाला पान पैसॉ नाय. तडश्या पोरांना शिक्षन आन त्या संगोपन यो प्रश्न तडे पयलॅ आपल्या कॅथॉलिक चर्चन्ये हाता घॅतलॉ, तडश्या लोकांना यी खुब बरा वाट्यासा कारन त्यास लोक यो गोष्टी कऱ्या ढॅढे येत नॉता. या कामात आपल्या वसईश्ये आन इतर ठिकानश्ये तडे आलॅल्या मिशनरी लोकाव खुब भॉठा योगदान हाय. आपल्या अडशी आन तडशी परिस्थितीविषयी बी एक हांग्यासा मंज्ये बारश्ये लोक आल्यामुळॅ तडे समाज आन संस्कृतीयी भेसळ जाल्ये, पान आपलॉ समाज अजूनही एकसंध हाय.

माई निवड जाल्योर वसई आन आपल्या समाजाश्या लोकाव जो प्रतिसाद माला मिळालॉ त्यान्ये म्ये खुब भारावॉन गॅलॉ. मा समाज माला एकटॉ टाकनार नाय यायी माला शाश्वती मिळाली, आपल्या अडश्या लोकांना मा ऑडास हांगना हाय की जही भाषा आन संस्कृती टिकव्या तुम्ये पुढॅ पडल्या तहेस आपल्या समाजामिन्श्यो अयोग्य रूढी हात त्यो काड्यादो प्रयत्न करा आन आपलॉ समाज पुढॅ कहो जायदॅ यावर लक्ष ठोवा. बिशप अंब्रोज रिबेलोश्यो प्रार्थना नेहमी तुमश्या पाठीशी हात.

## बिस साल बाद... - सिरील मिनेझीस, ८८०५०१०९५९

टिवीओर 'बिस साल बाद' ऑ वहिदा रेहमानसॉ ब्लॅक अँड व्हाईट शिनिमा बगीत 'गब्रू' तंगडे लांब्ये करॉन सोप्यामिन्ये आरामात भॅलतॉ.

'आरे, गबऱ्या लवकर बायार ये' झुझीनशा आवाजाय, गब्रू खमीज सडवीत घरा बायार आलॉ. नवी कोरी काळी टोपी डोख्योर ठोईत तॉ पोनाय निऱ्यो निट कऱ्या लागलॉ. त्यानॅ आंगळयात नंदार टाकीली,पान झुझीन कय त्या नंदऱ्या पडलॉ नाय.

'म्ये आडये हाय' हिंधाळयात पाय खाजवीत भॅलॅल्या झुझिनला बगॉन गब्रू अवाक झालॉ. मांडीपोत येनारी पट्यापट्याई बर्मुडा पॅंट, फुटबॉलशा टीमशा खेळाडूहारका तांबडा भडाख टी शर्ट,आन त्या सॉता कलरला बिलकुल सूट न होनारॅ पांडरे दुद बूट... झुझीनसो ऑ अवतार बगॉन गब्रू विसारात पडलॉ.

'म्ये कहो दिखात्ये' झुझीनशा या बॉलन्याय गब्रुई टोपी डोख्योरन्ये पडता पडता रेली. घडखीभर तॉ त्याओर बगीतूस रॅलॉ.

'आरे गबऱ्या, आपुन कय कॉमसारा प्रोग्रॅमला नाय ना साल्ले, आपल्याला समुद्रोर वॉकिंगला जासा हाय. वॉकिंगला अहोस डेरेस लागात्ये. जाय तू पान अहोस डेरेस करोन ये'

'आरे झुझीन, म्ये पान तूआ घती डेरेस कॅलॉ तॅ, तूआ घती या गब्रुई पान आब्रू जायदे, म्ये वॉकिंगला यास डेरेस मिन्ये येनार'

गब्रू आन झुझीन जिवाभावाश्ये मित्र. हाकोटे साडेपास वाजता पयल्या मिसाला त्याई भेट हॉयाशी. दोगे पक्कॅ धर्मवेड्ये. देवळासॉ कुहनॉपन कार्यक्रम ते सुकव्याश्ये नात. रॉज मिस्साला जासॉ त्याव नियम हॉतॉ. आपल्या धर्माबद्दल त्यांना खुब आपुलकी होती. दिहॉनदी आपल्या धर्माई प्रगती जालीस पाय अही त्याई इच्छा होती. हाकोटे मीस हुटल्योर त्या दॉगाई हांश्यापारा समुद्रोर वॉकिंगला जासॉ बेत कॅलतॉ बघून झुझीन बरोबर टायमोर हजर जालतॉ.

आजकाल वॉकिंगशी फॅशन आल्ये. पयला अरबाट-सरबाट पक्का जाम रगड्यासा, आन मिंग्ये सरबी आटवॉन पॉटाऑ घेर कमी कऱ्यादो वॉकिंग कऱ्यासा. ज्यांना कॉलेस्ट्रोलशी स्पेलिंग पान ये नाय बगील्या त्यांनास कॉलेस्ट्रोल जाम जाल्ये.

एकदाशी गब्रू आन झुझीनशी विटी-दांडूई जोडी समुद्रोर पोसली. ई विजोड जोडी बगॉन मॅरदॅरश्ये लोक त्यांना आहातोत्ये. गब्रूला लाजल्या हारका जाला पान झुझीन आपल्या मस्तीत वाळू रगडीत सलतॉतॉ. त्याला दॅरमॅरश्या लोकाई फिकीर नोती. थंडया वाऱ्यात गप्पा मारीत दोगे साल्लोते. त्या गप्पाव विषय हॉतॉ, गेल्या पन्नास वहारात आपल्या आडये जाल्येलॉ बदल. लानपनी

तुडवविलेली मुरमाई बिद. कष्टाय मिळविलेली दमडी आन सावली-पावली. पावसाळ्यात गळनारा जवळ जवळ प्रत्येका कौलारू घर. भात पिकवनारो अडसॉ कुनबी. अडशा लॉकात तिगाळा अहलेली गरीबी. बायार देशातन्ये यॅनाऱ्या पैश्योर टीगाळश्ये फादर देवळाव कारबार सालव्याश्ये. कशिनमिन्ये पास-दा पैशाए नाने हयाश्ये. बगताबगता ओडे वहरे गेले, जकला बदलला. बिद गेली आन डांबरी सडको आल्यो. कौलायॅ घरे भुईसपाट जाल्ये आन शिमीटश्ये बंगल्ये आबाला हात लाव्या लागल्ये. देऊळशा कशिन मिनश्ये हुट्टे पैशे गॅलॅ आन त्याई जागा बॉठबॉठ्या नोटाई घेतली. अजून वीस वहरान कॉडॉ बदल हॉयर्दॅ? तिगाळा आपला देऊळ आन त्याव कारबार कहॉ सलर्दॅ ? ऑ सगळॅ विसार त्या दोगा मनात आलॉ. पान वीस वहरानंतरसा आपल्याला काहा बगीता येर्दॅ ? कदाचित तिगाळा आपुन दोगे या दुनियेत नहनार. वीस वहरा नंतरसा आपल्याला बगीता आलोसा तॅ कॉडा बारा जालोसा, आहा दोगांना वाट्या लागला.

सलतासलता झुझीनला समुद्राआ काठाला एक असनॉ भॉट्टॉ शंख (खोबरी) पडलॅलॉ दिखलॉ. आपल्या तंद्रीतुस त्यान्ये त्या शंखाला लात मारली आन पायात बूट असताना सुद्धा आपलॉ उजवॉ पाय हातात धरॉन तॉ नाशा लागलॉ (कळूस तही आल्ती) तॉ शंख थॉड्या लांब गडगडात गॅलॉ आन फुटॉन त्याये दोन भाग जाल्ये. आन त्यातन्ये एक वस्तू बायार आली. 'पीके' शिनिमामीन्ये आमीर खानशा गळ्यामिन्ये आहात्ये तहाशे तहा 'लॉकेट' होता ता.. गब्रून्ये ता लॉकेट तुकीला, ता चमकातॉता, त्यातन्ये निळॉ प्रकाश बायार पडतॉतॉ. त्याला वरती एक आन खाला एक अहे दोन बटने होते. जकले पयले वरन्ये सुरवात करत्यात भगून गब्रून्ये पयला वरसा बटन दाबीला. त्याबरोबर शित्रविशीत्र आवाज त्या कानोर पडल्ये. दोगाई मांगॅ वळॉन बगीला किनाऱ्योर त्या दोगाखेरीज कुनुस नॉता. आजूबाजूला काळोकिट जालतॉ. दोगे जाम टरकाले. ऑड्यात एक आवाज त्या कानोर पडलॉ.

'मै समय हू... ज्याला तुम्ये काळ, वेळ बॉलत्यात तॉ समय मंज्ये वखत हाय. 'ई आयकितास दोगा तोंडोरसॉ पानी उतारलॉ. त्याये पाय काप्या लागल्ये, त्यांना वाटला, भूत आला. पन पुढसा आयकॉन त्यांना धीर आलॉ, ती वस्तू मंज्ये एक 'टाइम मशीन' हॉता. त्यातन्ये ते वीस वहारानंतरसॉ काळ प्रत्यक्षात बागू शकातॉतॅ.

'आयला, ई मस्तस हाय, आपल्याला पाओता तास ई आपल्याला दावडनार' झुझीन खुशीत यॅवॉन बोयलॉ. तॉहॉ परत आवाज आलॉ. 'मग वाट क्याई बगीत्या, खालसा बटन दाबा.'

'नाका,नाका, आपुन अजून डोकरे हवेन्याव' गब्रूने शंका काडली. तॉहॉ परत आवाज आलॉ, 'तहा कईस हॉनार नाय, तुम्ये हात तोडेस रॅदया आन तुमाला परत यासा जाला गा वरसा बटन दाबा, तुम्ये होते तडेस परत येदया, ऑल द बेस्ट' आन आवाज बंद झालॉ. झुझीनला बटन दाब्याशी घई जाल्ती, पान पयला का बग्यासा यावर त्याई गाडी अडकाली.

'पयला आपुन वीस वहरान आपला देऊळ कहा हायर्दॅ ता बगॉ' गब्रुई ई सुचना झुझीनला पटली. पयला देऊळ बग्यासा ठरला. मंग का ? झुझीनन्ये घेतला मावली नाव आन दाबीला खालसा बटन. त्या बरबर त्या लॉकेट मिनन्ये ऑबडॉ लाइट या दोगा डोख्योर पडलॉ, घडखीभर त्यांना कईस दिखला नाय. हळूहळू लाइट गायब झाली आन आपुन आपल्या देवळा बायार ऊबी हात ई त्या लक्षात आला. समोर भॉट्टॉ गेट हॉतॉ. गेटशा बाजूला केबिन मिन्ये एक सुटबुट घायलॅलॉ चौकीदार टिवीओर कयतरी बगीतॉतॉ, तॉहॉ झुझीन बॉयलॉ 'आरे आपुन टिवीवर दिखात्याव. तॉ सीसीटीव्ही कॅमेरॉ हॉतॉ, त्या चौकीदारान्ये रिमोट कंट्रोलन्ये भॉट्टॉ गेट उघडलॉ. दोगे आतमीन्ये गेले. न सलता ते सरकत्या जिन्याय देवळा दारात पोसले. दारात 'मेटल डिटेक्टर'वर त्याई चेकिंग झाली. एकदाशे ते देवळात पोसले. देवळात लोक थोडास हॉता. जकले जेष्ठ नागरिक, आल्तारा ठिकाना भॉट्ठा स्क्रीन हॉता. त्यांना देवळात एक रुबाबदार व्यक्ति भेटली, ऑस फादर हायर्दॅ भगून त्यायी त्याला अभिवादन कॅला. 'गुड मॉर्निंग, फादर', 'मी फादर नाही, मेरनी आहे' 'मग फादर कुठे आहेत?'

त्या आहा जालता, फादरशी संख्या कमी जाल्ये भगून या देवळाला फादरूस नॉतॉ. मंग मीस कुन करतॅ हायर्दॅ ? ऑ प्रश्न दोगांना पडलॉ. या प्रश्ना उत्तर त्यांना आहा मिळाला की आख्या उत्तर वसईत फक्त नंदाखालश्या देवळात मिस्सा हॉनार आन बी जकल्या देवळात स्क्रीनवर त्या 'लाईव' प्रसारन हॉनार, आपल्याला आत्ये स्क्रीनवर रॉज मिस्सा बग्या मिळनार आहा त्यांना वाटला पान ताहा पान नॉता. मिस्सा फक्त आयतवारॅस हॉनार, इतर दिहाश्ये मिश्ये आयक्याश्ये हायद्यात तॅ सिड्यो विकत घ्या लागॅद्यात,रॉज

एक सिडी घरं बघ्याशी गा आयकीला मिस्स. ताडये एक स्टॉल हॉतॉ त्याओर वॅगवॅगळ्या कलरश्यो गोळ्यो विक्या ठविलत्यो. गब्रूने ई का हाय याई चवकशी केली आन त्यांना नवाल वाटला, ताडये बावन लाल कलरश्यो कॅपसुल होत्यो. यो कॅपसुल मिंज्ये बिदवारश्या नोव्हेंनाय होत्यो. प्रत्येक बिदवारॅ एक घ्याशी, एक वहाराऑ कॉटॉ,या बरबर ताडये वॅगवॅगळ्या नोव्हेंनाकरता वॅगवॅगळ्या कलरश्यो कॅपसुल होत्यो, मिंज्ये वेलंकनी माऊली नोव्हेंनाकरता पिवळी, देवळा आश्रयदात्याकरता गुलाबी, संत अंतोंनीकरता जांभळी कॅपसुल आन ज्यांना देवळात यासास नाय त्याकरता काळ्यो कॅपसुल पान होत्यो. त्यो जाम माग होत्यो. हजार रूपाला एक, ताडये एक एटीएम हारका मशीन पान हॉता. त्यात पन्नास रूपासॉ कॉईन टाकिलॉ गा मशीन मिन्ये उजव्या साईडन्ये एक हात बायार यासॉ आन तॉ कॉमिनो द्यासॉ, पान ताडये हंबल्या लागतोता, नशा करॉन कॉईन टाकीलॉतॅ डाव्या साईडन्ये हात यासॉ आन थॉबाड फॉडयासॉ. चवकशी केल्योर त्यांना बरीस मायती मिळाली. आडये लगीन-कॉमसार आन बाल्टिम ऑनलाइन होतोता, फक्त मरणावॅळॅलास फादर हजर रॅतॉटॉ. ई सगळा बगॉन गब्रूला ढक्कॉस भॅहलो. झुझीनशी जिब टाळूला शिटकाली. या जकल्याला आपुनुस जबाबदार ई जानीव त्यांना जाली. भावी पिढीला बरॅ संस्कार कऱ्यादो आपुन कडे तरी कमी पडल्याई भावना त्यांना जाली. आपल्या धर्माबद्दल आन आपल्या समाजाबद्दल अहलॅलॉ त्याव अभिमान मावाळलॉ. वीस वहारानंतर येनारॉ काळ त्यांना नकोसॉ जालॉ.

मंग का ? गब्रून्ये लॉकेट बायार काडला आन पटकान वरसा बटन दाबीला. ते दोगे समुद्रकिनाऱ्योरूस उबे होते. लान्ये पोरे वाळूमिन्ये लोळतॉतॅ. जवान पोरे फूटबॉल खेळतॉतॅ, जेष्ठ मंडळी तंगडे लांब करॉन वाळूत गप्पा मारीत भॅलतॅ, झुझीनन्ये गब्रू हातसा लॉकेट ऊसकीला आन समुद्रात उडविला लॅमका त्या टायमाला देवळा घाट जाला. आयमेरी जालती. गब्रू आन झुझीन परात फिरलॅ आपल्या घरा जादो. सलतासलता गब्रू तोंडात आजूस बगिलेल्या शिनिमामिनसॉ गानॉ हॉतॉ.

‘कही दीप जले कही दिल...........’

## बाबुकाकाई सोपडी... “सॉक्काट जाला... मांडव मॉडलॉ..!”

**- सचिन रॉड्रिग्ज (अठ्वरे डॉट कॉम), रांबाई**

बाबुकाकाॲ ऑबडॅ प्रयत्न / खट्पाट आन मध्यस्थीनॅ अन्द्र्याव रॅलॅलॉ ॲकलॉस पॉर शॅजाव (वय वहरे फक्त ४८) या ॲकदासा हैरा जाला...

शॅजावसा हैरा जाला ई बातमी / कानी आयकॉन आख्ख्या गावात जहनी हनाव माहोल तयार जालॉ. तहॉ आमसॉ शॅजाव १५ दिहाश्या हैऱ्या टायमात सातवॅळा हारोडी जाऑन आलतॉ, पन जिव्या करतान कतॅ थामलॉ नॉतॉ. पन मांगशा आयतवारॅ आमसॉ शॅजाव हारोडी जिव्या गॅलॉ आन, आन आन... माकून ॲकदा शॅजावसॉ मांडव मॉडलॉ...

तॅआ का जाला... आयतवारॅ आमसॉ शॅजाव हारोडी दॉपारसॉ जिव्यादो पॉसलॉ. हारोडी गॅलॉ तॅ शॅजावशी फुली नटॉन थटॉन, पावडरशा डब्यायस जहनी आंग धऑन दापूडॅ मेडीला हाथ / हात / आथ धरॉन शॅजावशी वाट बगीत ऊबी होथी / ओथी... शॅजावला बगॉन फुलीआ तोंडोर जा प्रेमा हांवा आला, तॅय शॅजावसा पॉट तडेस भरला....

शॅजाव आतलॅगा गॅलॉ आन बगीतॅ ते आतमीनॅ आख्खॉ गाव जमलॅ. मूंजॅ फुलीॲ मामा-मामी, मावसॉ-मावशी जकले आल्यात. जकल्याहरी ओळख-बिळोख समारंभ जाल्योर शॅजावशा हऱ्यानॅ शॅजावला बियर प्याशी ऑफर ठविली, पन आपल्या काळजोर दगडाइ आख्खी राहा ठवॉन शॅजावनॅ बियरला नाय कॅला तही मंग जिव्याशी तयारी सालू जाली. एक एक करॉन जकले जिव्याशे आयटम शॅजावशा पुडॅ या लागलॅ. कय रांदलॅला तॅ कय तळलॅला.... शॅजावशी बय गॅलॅॲला १५ वहरे जालते तत्पासून शॅजावशा तोंडाला ऑडा बरा खाना कुर्नॅ लाविला नॉता. जहॅ जहॅ खाशॅ आयटम येतॉतॅ तहॉ तहॉ शॅजावशा जीबेला पानी हुटातोतॉ, पन शॅजावसा आदीस ठरलोता गा कय जरी जाला, हाऊनॅ बळॅ बळॅ कॉडा जरी हांगीला तरी मट्नाॲ २ खडॅ आन पावाश्यो २ शिऱ्यो खाश्यो. बाकी कॅला बगुन हाथ / आथ लाव्यासॉ नाय... घारा जाऑन माकून जिव्यासा (तहॉ शॅजाव

घरनॅ जीऑनुस आल्तॉ) पन अडे जास्ती खासा नाय.

भगून शॅजावनॅ नुस्तॅ मटनाअॅ २ खडॅ आन पावाश्यो २ शिऱ्यो घेटल्यो. फुलीऑ मामा मावसॉ बेताम मांगॅ लागल्यात पन शॅजाव कय कॅलॅआ जास्ती घ्यादो तयार नाय... मंग एकदासा जिवान सालू जाला. शॅजावनॅ बशीतशा मट्नाव एक खडॉ तोंडात टाकीलॉ... तॅआ मट्नाव सवूस कय वायलॉ आन तॅआ सवा नादात शॅजाव आमसॉ बाहॉन गॅलॉ, गा तॉ हारोडी जिव्या आलॅ मनून. आन मंग जी शॅजावनॅ मुंडी खाला घायली... तॅ आख्खॉ बिटांनी पाव आन अर्दो मट्नाव बोळ खाली कॅलॉ.. तरीपन शॅजाव तॅआ मट्ना बोळामिनशी मुंडी कय काड्या तयार नॉतॉ.

'पॉरा! अजून पाव हाडॉआ रॅ ??' फुलीआ बयनॅ हळुस विसारला. ऑर्डॅत खाला मुंडी घायले तडनेस

"हा. हाडा.." शॅजावनॅ हांगीला आन मुंडी वर केली.

मुंडी वर केली आन बगीतॅ तॅ फुली आन फुलीए आख्खे पाव्ने डॉळॅए बटाटे करॉन शॅजाववर बगीतोते. तिगाळा शॅजावशा ध्येनात आला गा तॅला हारोडी पयलॅंदा जिव्या बॉलवॉन हाडलॅ आन शॅजाव मनातशा मनात बोयलॉ.."सॉक्काट जाला... मा मांडव मॉडलॉ"

ऑड्यात अजून एक बिटांनी पाव शॅजावशा पूडॅ आलॉ. पूडॅ बिटांनी पाव.. रादलॅल्या मट्नाव अर्दो भरलॅलॉ बोळ आन समोर अर्दा हुटलॅला हैरा (अर्दा हुटलॅला मंजॅ फुलीआ मॅरनॅ हुटलॅला पन अजून आशावादी अहलॅला शॅजावशा बाजूसा हैरा) या कात्रीत शॅजाव हापाडलॉतॉ. शॅजावला मिनिटभर कय सुचला नाय गा का करॉ - का नाय. मंग शॅजावनॅ विसार कॅलॉ फुली तॅ हातशी गॅलॅत जमा हाय पन मटन कादो हाथसा घालवॉ.

आन मंग शॅजावनॅ माकून मुंडी खाला घायली आन तॉ दुहरॉ बिटांनी पाव रांदलॅल्या मट्नाहरी जाग्या लावीलॉ... आन सॉप्पाट हाथ धव्या घारा गॅलॉ.

ऑडा हॉऑन पन आमसॉ शॅजाव जाम आशावादी. हांशापारा तॉ बाबुकाका घारा गॅलॉ आन आख्खॉ कारनामॉ बाबुकाकाआ कानोर घायलॉ आन बाबुकाकाला अॅकदा ह्ऱ्याला फोन करॉन परिस्थितिऑ आढाऑ घ्याशी गळ घायली... मंग बाबुकाकानॅ शॅजावशा ह्ऱ्याला फोन कॅलॉ आन हळुस विसारला...

"व्यायान्दो, आमसॉ पॉर बाकी तुमाला कहॉ वाटलॉ..?"

"बाबुकाका, माला ई हैरा पूडॅ नेता यासा नाय." शॅजावसॉ हरॉ

बाबुकाका थॉडा आवसान धरॉन बोय्लॉ, 'पन तुमे सरळ अहा कादो ठरवीत्या..?'

शॅजावसॉ हरॉ थॉडॉ रडल्यागतूस, 'बाबुकाका, ऑ जावाय जॅ माकून जिव्या बॉलवॅसॉ हायदॅ ना, तॅ माला आख्खा हिवार अर्दल कऱ्या लागॅदॅ..?

## कुपारी तडका –सचिन मेंडिस

काल एक अंकल भेटलॉतॉ. पॉरायी जाम तारीफ करतॉतॉ. माला हांगात्ये, 'हेगट बरॉ, परवडलॉ. पण ई नखितर. हाथ जोडल्ये. नुसतॉ ऑलॉ बुंबुल. जागसॉ हालॅ नाय. खावटी मात्र आमशा ई हारखी. ई भरखाट आन ऑ आडसळ. कामधंदॉ कय कऱ्या नाय पण हांच्यापारा बक्काट जीव्या पाय. ई सगळा याला मामारशा बाबान्ये हिकविलॅ. त्याला पन कुन हिकवितॉ नाय. एक नंबरसा निंबूसोक्या. माला कत्ये काडी मदत नाय आन ताडीकरता हाकोटे ओट्योर उबी. मायी हाऊ तर भाईंदर फास. उठसुठ तोंडात 'माटुंगा गेले ला' लागलॅला. जहॉ ई बाबान्ये माटुंग्यासॉ पास कार्डॉन दिल्ये जकल्यांना आन माये हाळॅ का हांगॉ? बैल परवाडल्ये, राटाला तरी झुपता येत्यात पन यॅ का कामायॅ. यॅ कय राटापेक्षा कमी नात. खांडीभर खायद्यात आन आपलीस आयमाय करद्यात. बॅंकेयी नोटीस आली गा देवळात कशीन मिन्ये टाकीत्यात. एक हाळी हाय, आमशा ई भोठी बेन. ती विषयी कय जास्ती परिचय दे नाय. एक ते अह्या सैतानी कुटुंबाशी आन त्यात लानपनी डोख्योर पडलोती. आमशी हाय तहीस ती भायखळी. ती तरी डोख्योर पडलोती पन आमशी ई डोख्योर न पडता पन तहीस.

मे अंकलला हांगीला 'अभिनंदन'. का माहाने दिल्यात परभूने तुला. गावशे तुला आदुलो कादो हांगात्यात ता कळाला माला.

## बोयला गा हांगातॅ, दादा बॉलातॅ.....

--- सॅबी परेरा, भाठी, नानभाट

निजविला तॅ रडातॅ
धरला गा हावातॅ
ढायपर बिलकुल भिजवि माय
ताहास धरला तॅ आंगोर मुतातॅ
आन बोयला गा हांगातॅ, दादा बॉलातॅ

खादो नखरॅ, प्यादो नखरॅ
शाळीमीनॅ तॅ जास नाय
पुस्तकात मोबाईल, मोबाईलमीनॅ वॉटसअप
तॉ बॅहॅतॅ खोलीत आन ध्यान नाकयोर आहातॅ
जिव्यादो भाहातॅ पन मैतरनीआ वाड दीला पातेराती फोन करतॅ
कॉलेजपेक्षा जास्ती वेळ याव माथा उकल्या जातॅ
आन बोयला गा हांगातॅ, दादा बॉलातॅ

कपडे, मोबाइल आन मेकप यातनॅ ती बायेरूस पडॅ नाय
पॅनारॉ 'बॅवडॉ' न पॅनारॉ 'बायलॉ'
इला नवरॉ कहॉ पाय तास कय उमजॅ नाय
शीवलेस – बॅकलेस घालॉन दॅवळा जातॅ
आन बोयला गा हांगातॅ, दादा बॉलातॅ

इन्कमटॅक्सशा रॅकॉर्डपरमानॅ, ऑ भाड्यानॅ रॅतॅ
मयन्याला रुपय २५००० बाबाला भाडा देतॅ
खरॉ पायतॅ, बय-बाबा हाथाला हाथ कय लावी नाय
शारसॉगात भॉटॉ सोशल वर्कर बनातॅ
आन बोयला गा हांगातॅ, दादा बॉलातॅ

हाकोटे मिस, हांसा तेस कय भगून ती होडी नाय
ईएकली तोडी बरी बी जकल्या दुनियेत कय ना कय खोडी हाय
जावायशी करनी मिरवितॅ, ऑबायशी करनी खूपातॅ
आन बोयला गा हांगातॅ, दादा बॉलातॅ

पॉराय बूट आन नातवा टीशर्ट घालतॅ
स्कूटर घॅऑन तळयोर वॉकला जातॅ
तॉडाय सव, कय कॅल्या कमी हॉत नाय
बांगड्यो वाजल्यो गा चष्म्या फटीतनॅ मॅरॅ-दॅरॅ बगीतॅ
आन बोयला गा हांगातॅ, दादा बॉलातॅ

लंगातॅ-टांगातॅ पन दॅवळा जाय हांगातॅ
खोकल्याई उबळ हॉशॅ नाय पन प्यादो लेमन मांगातॅ
दॅवादरनॅ मरान मांगातॅ पन काळोखाला घाबरातॅ
आन बोयला गा हांगातॅ, दादा बॉलातॅ

जीविताना टिवीओर 'पोगो' पाय
जरा दम दिलॉ तॅ भॅख्या लागातॅ
आन बोयला गा हांगातॅ, दादा बॉलातॅ

काम हांगीला तॅ हांगातॅ मॅ लानी हाय
पिसाळला, तॅ हांगातॅ मॅ आतॅ बोठी जाले
लाली-पावडरसा घरात दुकान मांडीलॅ
बय-बाबा म्हनना साफ रद्दीतुस काडतॅ
आन बोयला गा हांगातॅ, दादा बॉलातॅ

## माऑ शानो बाबा

– पास्कोल कोरिया, खोडाळेवाडी, नंदाखाल

बाबा तांबडी टोपी गरागर फिरवित्ये दारूआ नशेत
हुश्यारी कऱ्यासॉ खुब, नहोन तांबडो पैसो खिशात
पक्की झाल्योर कुनाई हाय बॉल्याशी बिशाद

भॉळॉ भाबडॉ वाट्यासॉ,आख्खी बाटली गावाला
पाय तिगाळा कुनुस नहयासा या मॅरॅ नावाला
कब्जा सडविला गा निंग्यासॉ कुनाही कामाला
काम झाल्याशिवाय चैन पड्याशी नाय त्याला

बाबाला कामकाजाई, पैश्याअडक्याई नोती चिंता
सगळॉ आटॉपीटॉ करॉन बय होडवितोती गुंता
बाबाला कडेही जादो मोकळा होता रान
पोरेपारे,शिक्षान,जिवानखान या नोता भान
व्याज न घेता पैशे द्यासो अडसनीत जकल्यांना
एकू नाय ओहो,जो येदे अडसनीत कामाला
ओडा करोनही बाबा यातने कय हिकलो नाय
त्याला कोडा समजाविला,समजावितोती भोटी बाय

बैल पानी पाज्यादो न्याशे नंदाखाल तळयात
आराम कऱ्याशे खोडाळश्या शिशा खळयात
घुंगुरमाळा रुनझून करतोती भिंगाऱ्या गळयात
मण्याई माळ होती काळयाबाळया बैला गळयात

आजारपणात होतो पान कतेस कय बोयलो नाय
समजोन होतो तो जेजूमरी आपल्या वाट्याई हाय
बाबो तुला आबोर आब्राहम बेठलो गा नाय
तुआ लेकरू सुकात, तुई आठोन काडतो हाय.

## कॉलेजशी आठोन – रोशल मेन, भुईगाव

आज बऱ्यास वहरानंतर कय कामाकरतान वसय गावात जा लागला./ जासॉ योग आलॉ. कॉलेजनंतर ताहा तडे जाना बंदुस जालॅ. जाताजाता तामतलावशा लिबर्टी हॉटेलमीनॅ जाऑन खिमा पाव खासा मन भुकॅमुळॅ मॉड्वाल नाय. तॉस तिखटाव सव अजूनपोत हाय तहॉस. मजा आली. जी. जी. आन टी बी. कॉलेज ला जासा भाग्य ज्या नशिबी आला नातॅ हाडला गॅला त्या जकल्याना या खिमा पावसा वॅड्स. हॉटेलशा नावापरमानॅ सापसुप आन सामान जडशा तडे ठॉऍसास नाय इ हॉटेल रीत अजूनपोत हाय तहीस. थॉडॉ वेळ ऑथॉ भगून मॅ पुडॅ गॅलॉ. एकेकाळी आपल्या अडशा पोराव अडडॉ अहलॅलॉ एस. टी. डेपो डॉळॅ भरॉन बगॉन घॅटलॉ. खूप कमी लोक दिखला डेपोत. १५ वहरा आदी कॉलेजला ऑथॉ तिगाळशी या डेपोई शान आठवाली. ऍका मॅरॅ भुईगाव, गास, निर्मळ, हॉरापा जानारे पोरे अहे ऊबी अहॅशे गा अर्नाळा बसशिवाय आपला घारा शक्य नाय. तॅ मावरा विकनारयो कोळनी ‘इ अर्नाळा बस आपलीस’ आहा तॉड करॉन ऊबी रॅश्यो.

तॅ बीआ मॅरॅ एस. टीत काम करणाय़्याई, कामा शॉधात फिरणाऱ्या मजूराइ गडबाड, पास कार्डआ कॉलेजशा पॉराइ लागलेली लाम्बि रांग इ जकला आठवाला. एकेकाळी या डेपोत काम करनारॅ आपल्या अडशॅस ऑथॅ. जॅ कतॅ कतॅ एटीकेटी मिळालॅल्या पॉरा कामा याशे. यामिनशॅ एकदोगी कंडक्टर तॅ आमशॅ खास ऑथॅ. ऍकानॅ तॅ एकदा आमश्यो बॅग रागाऍ सलत्या बसशा बार टाकॉन दिल्यो (आमे तॅ तॅइस वाट बगीतोते). एसटी दरनॅ आमा पॉराना कमी पैशात मिळनाऱ्या पासाव ऑ राग ऑथॉ. आज इ जकला बदाललॅला वाटला. वर हांगिलॅलॅ खुपशे एसटी कामगार आतॅ रिटायर जालॅत नातॅ हॉऍशा मार्गोर आन कतॅ एकदा पॉरापाराय लग्ने आटपॉन टाकीतॅव या विसारात आथ. (पुडॅ इजरायल, येरूस्लेम करॅसा हायुस, पन ता नंतर).

आतॅ वसयनॅ अर्नाळा जानारॅआ बससॉ पयल्याहारकॉ रुबाब रॅलॉ नाय. बदलतॅआ काळाबरबर बससा वैभव खपलॅ हारका वाटला. या बसनॅ आजपोत कॉलेजशा पॉरां परवासाबरबर तॅआ आयुष्याव पायॉ घायलॉ. (मावरॅव वास घॅत घॅत तरुण रुदये पन यास बसमीनॅ फुलले) आथा अजून टाइम ऑथा भगून वधार गॅलॉ. बीकॉमसॉ तिन्ही वहराव अभ्यास कॉलेज हॉडॉन जडे कॅलॉ तॅआ गणेश अकेदमीओर नंदार गेली. वेहीवेहीत उगडलेल्या क्लासशा बाजारात गणेशसॉ दरजॉ अजून वरसॉस हायदॅ याई खात्री हाय. बाकी चिमाजी आप्पा मैदान तडेस हाय तहास हाय. (ता बी जाऑन जासा कडे). रस्तॅ आन दॅरमॅरसॉ जालॅलॉ बदल बगॉन ‘‘विकासवालॅ’’ आपल्या नावाला कडेतरी जागल्यात आहा वाटला. वाहना गर्दीत पारनाका पार करॅआ बेताम टाइम लागॅसा, आतॅ तडे जालॅला अतिक्रमन काडलॅनॅ रस्त्तॉ बरॉ मॉकळॉ जालॅ. टिबी कॉलेजशे पोरे तामतलाव वरने वसय डेपोत पायी येत्यात इ बगॉन आजही इ जुनी परंपरा सालू हाय या कवतीक वाटला.

खरा हांगॅसा मिंजे बदाललॅलॅआ आन समकत्या काळात कॉलेजशा गाजलॅल्या आन गजबजलॅलॅआ जुन्या दिहाशी आठोन मन ऑला करॉन गेली.

## पाशीहार – वेरोनिका लोपीस

**तिगाळशे कामे**

इ जक्ला लिव्यासा कदो तॅ जकल्या तरुन मंडळीला तिगाळसा खाना-पॅना, कामकाज, सोयीसुविधा या जकल्याई माइती मिळदे. कादोडी शब्द कडेतरी जतान हॉऍद्यात. पयल्यांशा टायमाला आमाला काम पन खुब करॅआ लागॅसा.

बयबाबाऑ सवसार कायमूस तॉकडॉ, तॅतॅन पोरे एकदा सव्वीसातवीत गेले गा त्यांना पन सवसाराला हाथ लाव्यादो काम करॅ लागॅसा. पयला काम मंग अभ्यास आहास थॉडासा तिगाळा सलॅसा. भाटात खुब कामे अहॅशे. निंदनी, कांडोळयो करॅश्यो, केळीए बुडे सडव्याशे, केळीआ आंगाठा कापॅसा, हिप्ना करॅसा, राटोर बैल आंबड्यासॉ अहे जकले कामे आमे पोरे तिगाळा करतोते. शाळीतनॅ आला गा दॉपारा भाटात जासा आन अभ्यास हांशापारा वाटला तॅ आन ता पन टाइम मिळाला तॅ करॅसा. बयबाबाला अभ्यासाआ कय पडला नॉता. जा का अभ्यास हॉऍसा ता मास्तर आन बाईशा धाकाऍ. घरसॉ अभ्यास कॅलॉ नाय गा पाठ फुटलीस आहा समजॅसा.

सव्वीसातवीत अहताना आमे हाकोटे शारला उठॉन कुनाकुनाऑ मॉगरॉ खुडया जाशे. डॉळॅत नीज आन कमरॅला मॉगरॅइ पिवशी. ऍका आथात बंबाळॉ दिऑ आन बीआ आथाय मॉगरॉ खुडॅसॉ. मैनॉ  भरलॉ गा, आन खाडॉ नायदॅ तॅ

आमाला साडेसात रुपय मीळॅशॅ. त्याकरतान आमाला हाकोटे शार तॅ सात साडेसातपोत काम करॅ लागॅसा. पन तॉडॅआ पैशाय पन सवसाराला मदत हॉॲशी.

मीठॅला पैशे तॅ कॉर्डॅ लागॅशॅ पन ता मीठा हार्डॅदो आमे तिगाळा हाकोटे काळोखाॲ पासला उठॉन पायीपायी हॉपारॅआ तळनात (खाटान) जाशे. राखणदार मागॅ लागॅदॅ या घाबरॅॲ पटापट मीठा गुणीत भरॅसा आन धाव मारॅशी. मिनजे का, तॅ मीठा सॉरॅसा. पन ता मीठा डोख्योर घॅटला गा कळॅसा गा इ कॉडा जड काम हाय ता. मीठॅआ वजान छातीओर भॅहॅसा.

शाळीतनॅ आले गा दॉपारा अडीस वाजता आमे स-सात पोऱ्यो राना ऑल्ता जाश्यो. जकल्या पोऱ्यामीने मॅस लानी ओथी. आमसॉ एक पांडॉ काळया ठीपकॅवाळॉ बैल ऑर्थॉ, तॉ माला बेताम आवडॅसॉ, त्याकरतान ऑलात हाडॅआ मॅ जाशी. जळत्या निंबरात बिनचपलाॲ वटारशा नातॅ जॅलाडीआ राना आमे सलात जाशे. ऑलात काडोन हाडला आन गॉठॅत टाकीला गा, 'हुक्क्या पॅडॅआपेक्षा कयतरी बरा मिळतॅ आन ढोरे खाऑन बरे हॉत्यात आहा माव बाबा हांगॅसॉ.'

पाहाळॅत आवणीआ टायमात, आवान खीनॅसा. मूठ बान्दॅशॅ. मूठ बावीखाला धवॅशॅ आन निथळात घालॅशॅ इ आमा लान्या पॉरा काम. बाबा भारॅ बान्दॅसॉ. लान्या पॉरांन करतान लानॅ भारॅ. मंग आमे नींगॅशे गावड्या जादो. बसवाळॅनॅ बसवर भारॅ घॅटलॅ तॅ बसमीनॅ नातॅ पायीस निंगॅसा. रास्तॉ तुडवित, रेल्वेरूळ पार करीत. पानॅए भरलॅल्या वीरॅतनॅ, ऑडॉऱ्या बारक्या सारीॲ भरलॅल्या कांड्योरनॅ, भर पडतॅआ पान्यात मनवेल पाडयोरशा हेतोर. आवणी, निंदनी, कापणी, बांदणी, उडवा घाल्यादो आमा लान्या पॉरांइ मदत लागॅशीस. पिकाआ गाडा नातॅ लॉरी घारा याशा आदी खळा तयार करॅसा. हेंडोळ करॅशी. खळा हारवॅसा. पीक घारा आला गा झोडनी, मळनी. मळनी करताना बैलानॅ पिकात हॅन्पॉ घायलॉ ना पा भगून बारक्या बुकुलीत तॉ घॅसॉ. जकलेस कष्टाए कामे तिगाळशा लान्या पॉरांइ केल्यात. वार्षिक परीक्षा खपली गा आळशीए पिकलेले केळे, बाफलेले अळकुर्ने, रताळे घॅऑन आमे अर्नाळा कोळीवाडॅत हुक्का मावरा हाडॅआ जाशे. कोळीवाडॅआत फिरॉन हुक्क्या बुम्ब्लायो काडयो, हुकके मांदेळे, हुतेऱ्यो मिळव्याशे आन पाहाळॅ करतान भरॉन ठवॅशे.

दुकनोर जाऑन सामान हाडॅसा. भई सऱ्या न्याश्यो. तळयाखाला धव्या न्याश्यो. डुककुर बाळगीलॅ हायदॅत तॅ खुडी धव्याशी. डुकरा करतान गावातनॅ पॅज जमा करॅशी. बैल, डुककुर, भयला खाना घालॅसा. ये कामे पोर करॅशॅ. हेनी घालना, तॅआ करतान गिरनीतनॅ तुहू हाडेसॉ, झड बांदया माडायो हावळयो वळॅश्यो. हाले कुटॅशे, काथॉ तयार करॅसॉ, त्यायो लोन्यो वाळयाश्यो, हुंब वळॅसा आहा जक्ला काम आमे पोऱ्यो करॅश्यो.
अह्यापरकारे पयल्यानशा काळात आमे आन आमशा हारके लाने पोरे जाम खपेशे. मेहनतीए कामे करेशे.

**तिगाळसा मनोरंजन**

पयलॅनशा काळा कुहनेस मनोरंजनाए सादने नोते. मंग आमसा मनोरंजन का..? तॅ, तरॅतरॅय खेळ. पोरॅय खेळ मावशीबास, कुकाबास, खोबऱ्यो, आट्यापाट्या, हेनकळीत गोळगोळ फिरॅसा, सयपाक करॅसॉ. सयपाकादो भांडे मंजे कासुल्यो, शिशाए पाने खडवॉन त्यायो काडयो कड्याश्यो. त्यो मिंजे बुंबलायो काडयो. पाने मंजे हुकट. घरशॅ थॉर्डॅ साउळ सॉरॅशॅ, काड्योकुड्यो जमावॉन लाव्याशे आन थॉडॅआ वॅळात कासुली जळयाशी. पन खेळ कतॅ बंद नाय जालॉ. लगोरी, विटीदांडू, लंगडी अहॅ खेळ पोरपोरयो मीळॉन खॅळॅशे. करज्यो (करजा झाडायो हिंगो) बाठ्ठॅॲ, शिसारॅ, शिन्यो (चन्यो) गॉटॅ, बॅटबॉल, हुतुतू, बाटलीये खोके, पत्ते ॲ जकलॅ पोराॲ खेळ.

तिगाळशे वाहने का ओथे बैलाआ गाडा आन टांगाआ. अडीअडीसनीला टांगा बॉलव्याशे. लानपनी आमे दिव्योर अभ्यास कॅला. १९६५ – ६६ ला आपल्या भागात लाइट आली. ज्याई आयपत ओथी त्याईस मीटर घॅटूला. मा बाबानॅ १९७० सालात सलॅपसा घर बांदिला आन तिगाळास मीटर घॅटलोता. १९७० ला आमशा अडे दोनूस सलॅपशे घरे ओथे. १९७५ नंतर आमशा घारा रेडियो हाडलोतॉ. आमे पोरे तिगाळा किरकेटशी मॅच कान लाऑन आयकॅशे. गावस्कर, विश्वनाथ ॲ आमशॅ आवाडतॅ खॅळाडू. माऑ बाबा हिंदू कोलोनीत गावस्करशा मामारा, नारायण मंत्रीआ घारा (माधव मंत्रीऑ बाहा) तिगाळा माल घॅऑन जातोतॉ भगून मा भाहाला मॅच बगॅदो वानखेडेशे तिकिटे पन मिळालते.

गावशॅ पॉर तिगाळा किरकेटशी मॅच टिवीओर बग्या कोफराडशा आप्पाशेठशा घारा जाशे. मॅच खिडकीतनॅ टांगॉन बग्या लागॅशी कारण खुब पोरे येतोते. नंतर हळूहळू लोक टिवी हाडया लागले पन ते लोक पन कमीस. गावात पंखॉ कुना गायी नॉतॉ. गरमीॲ दि सुरू जालॅ गा घरश्यो खाटो बार काड्याश्यो. आख्खॉ गावूस आंगळॅत नातॅ ओट्योर भुयोर नीजॅसॉ. जॅआ घर सलॅपसा हायदे ते वर कोब्योर नीजॅशे. मुंबरा तिगाळा नॉता भगून बिनधास / बेलाशक बार नीजता यासा. मा आठोनी परमानॅ पंखॉ १९७६-७७ साली आलॉ अहलॉ पाय.

शाळीत जादो एकुस विनिफोम (युनिफॉर्म). पेन पेन्सिल / पंशळ पन एकेकुस. पुस्तके तीनशार जनाई वापरलेले, जुने, फाटके, हिवलेले मीळॅशे. तिगाळा मुंबईला गिरगावात सेकंडहँड पुस्तके मीळॅशे. वहयो पन थोडयो नवीन आन थोड्या बाईडिंग केलेल्यो अहॅश्यो. माथॅयो रिबिनी पन वहराला एकदास मीळॅश्यो. पॉरांदरी शिलपर पन नहॅशॅ. मॅ सटवीत असता मा बाबानॅ माला काळॅ बूट आन पांडॅ मोजे हाड्लोते. (मुंबयशा गिराका पोरीॲ जुनॅ जालतॅ तॅ) मॅ तॅ शाळीत घालॉन गेली तॅआ दुहऱ्या दिहा बाबा मा भोठ्ठ्या बयला बोयलॉ, ‘पोरीला बूट हाडलॅ खरॅ पन भोठी अडसन आले. मा हरोरशा दोगातीगा पासवाळॅयो पोरयो बुटाकरतान रडत्यात. आतॅ त्याइ कडनॅ हाडॅशॅ बुट. त्याकाळी बुट वापरना चैन ओथी. दफ्तर नॉता. वह्यापुस्तकांना रबर लाऑन टॉ गाठठो पॉर खांदयोर आन पोरयो आथोर नेतोत्यो.

बाव घरापासून लाम्ब अहॅशी. पानी बावीतनॅ पयरॅए काडॅआ लागॅसॉ. तपयलीत पानी भरॉन ती तपयली घारा नॅशी. अहयो दोनशार फेऱ्यो दिहाला दोनदा हाकोटहांज हॉॲश्यो. पाणी ठव्या घरात पानेरी अहॅशी. त्योर तपयली नातॅ हांडॉ ठवॅशे. पॅलॉ एकुस जॅय जकले पानी पॅश्ये. बावीआ मॅरॅ तीनशार फुट रुंदा आन फुटदिडफूट उस्सा मातीऑ टॅपार अहॅसा. त्योर परतेकाऑ कथान धवॅसॉ दगड अहॅसॉ. जडे जॉरजॉराय आपटॉन आपटॉन कथान धविला जासा. तिगाळा हाबूऑ वापर कमी हॉतॉ. तिगाळा ५०१,७७७ अहॅ हाबू मीळॅशॅ. आमाला मोत्याशेठसा भाट डाळळा जवळ. तडे पानॅइ मोटर ओथी. मोटरीऑ पानी ॲका कोंडीत जमॉन मंग दांडात जासॉ. आमे जकल्यो पोरयो तडे कथान धव्या जाश्यो. पाससात गावश्यो बायकोपोऱ्यो तडे कथान धव्याश्यो. एकमेकीला कथान धव्या मदत करॅश्यो. मॅ सातवीत असतास मा भोठ्ठ्या बयसा तांबडा लुगडा आन नानीआ उबा लुगडा (नववारी) माला धव्या लागॅसा. माए जुळे भावंडे १७७१-७२ ला दॅवा घारा गेलते भगून माइ नानी (आई) घरातनॅ बार पडात नोती. तिगाळा स मयनॅ नातॅ वहरी दुख पाळॅशे.

सुल जमिनीओर अहॅशी. सुलीआ मांगॅस गोडेतॅल, घासलेट, मीठा, मशालॉ ठवॅशे. एकदा मा बयनॅ गोडेतॅलाएवजी जीवनात घासलेट घायलोता. कारण तिगाळा असनॅआ भोठ्ठॅआ सुलीपुडॅ शाळीशीआ बलोर कमीस दिखॅसा. कपडे ठव्यादों घरात एक पेटी अहॅशी. बी कपडे घरात हुंबाआ तळा बांदॉन त्योर टाकॅशे. घरात बांदलेले संडाशे नोतेस. भोठ्ठ्या मंडळीकरतान वळलेल्यो हावळयो बांदलेले संडास अहॅशे आन पोरेपारे रस्त्योर जाशे.

यो जकल्योस गैरसोयी वाटेद्यात तुमा तरुनांना पन आमे ते जगल्याव आन विशेस मंजे आमे त्यातुस सुखाय वाडल्याव..

## मॅ कुन हाय...? – **फ्रँक मिरांडा, जोसघर (जोहाघर)**

शा पटकान तोंडोर वाळॉन मॅ रॉजशा हारकॉ धाव्यादो काळोखाय हिवरात गॅलॉ. शिशाखाला थॉडॉवेळ हाथ वरखाला करॉन मॅ धाव्या सुरवात करे ऑड्यात कुनतरी आडडाला. मॅ घाबरलॉ थॉडॉ पन नंतर माला उमजाला गा मॅ जमीनीआ तोंडोर पाय ठविलतॉ आन ती आड्डातोती. मॅ पटकान मॅरॅ जालॉ आन तीइ माफी मांगिली त्योर ती नुसती हावली पन माला माफ कॅला. मंग अहयोस गोष्टी करता करता तिने माला तीआ खरा दुख हांगीला.
ता आहा...

भुरा, शिमा, बस्त्याव, फरशी, दुझ्या आन रोजी आहा जकला जुरान सा बिराड. तिगाळा जकल्यास घारा जाम गरीबी. त्यात कुना शिकशान पन नॉता भगून जकले भाटातुस मंजे मावर खपॅशे. जुरानसा बी जकल्या हारकास. त्याए जकले पोरे माइ बेताम शेवा करॅशे. कतॅ माला कुदळ, नांगराॲ भूसकॅशे तॅ कतॅ खूरपॉ आन पंजॉ घॅऑन ऑरबाडॅ काडॅशे. लागॅसा खुब पन दुख कतॅस हॉॲसा नाय उलटा बरा वाटॅसा गा मा मुळॅ कुनावतरी सवसार सुखाय सल्लॅ. माइ काळजी पन खुब घॅशे. जुरूकसा माथा (गवात, सार, दाब) वाडला गा पटकान कापॅशे. माला भूक लागली गा खत आन राखडी द्याशे. हो लागलॉ गा पानी द्याशे कतॅ कतॅ रोगर उ द्याशे. जकला कय हारका हुरका सुखात सल्लॉता पन १५-२० वहरे भरलेस गा आन जकल्याना एकदम का जाला कुना गाइ...?

जकले पोरे शाइत जा लागले. अडनी अहॉन हिकल्यागत वागणारे पोरे आतॅ शाइत जाऑन अडान्यागत वागॅआ लागले. मंग माय जाम हाल सालू जालॅ. मा माथॅव वेळ जालॉ पन कापॅसा नाव नाय. हो लागॉन घसॉ फुटलॉ, भुकी रॅऑन माए आतडे पिळले, मा आंगोर दरळयो पडॅआ लागल्यो पन कुन डॉकाई नाय. जकले पोरे हिकॉन आतॅ भोठ भोठ्ठॅ पगार घ्या लागले भगून त्यांना माइ शेवा करॅआ वाटॅ नाय. ज्या आंगोर त्यांना मॅ खेळविला-वाडविला आन आज ऑडा भोठ्ठा कॅला ते

माइ किमत दोनशार दलाल बॉलवॉन करॅआ लागल्यात /निगाल्यात. माला खुब वाईट वाटला पन हिकलेल्या अडानी लोकांना बरॅइ अक्काल द्याशी कुनॅ..?

दोन बुके हिकले का आन जुरानशा पॉरांमीनॅ मारॅ सुरू जालॅ. परिस्थिति बदाललोती इ माइत ऑथा पन मा नाख्खॉड्या तुकड्याकरतान जुरानशे पोरे एकमेकाव जीव घॅदो पन मांगॅपुडॅ करॅशॅ नात इ माला माइ मॉजमापनी करताना उमजाला. जॅआ ताटात जुरानशे पोरे मा पुडॅ जीवॅशे आज तॉस ताट ते एकमेका डॉखॅत मारॅआ तयार जाल्ते.

मा करतान तुमे इ कदो करत्या..???

मॅ एक जीव नहलेली गोष्ट हाय...

कॉडॅ आलॅ कॉडॅ गॅलॅ पन माला हरी घॅऑन कुनुस गॅल नाय. जकले गेले ते ७x२ शा खाशीत.

ऑडास नाय तॅ पुडॅ पुडॅ जुरानशा पॉराइ ऑ मामलॉ पोलिस खात्यात मंग कॉरटापोत पोशवीलॉ आन आख्ख्या जीवनाए नाते मा ॲका तुकड्याकरतान आयुष्यभरा करता तोडले.

पॉरा तुस माला हांग, ‘ मा मीनॅ आहा का हाय ज्या करतान ए आहा करत्यात.’

मॅ हाय कुन...?

मॅ हाय कुन...?

## अंद्रया , फुला आण भयदिवाड !! - **सिमसन बिशामास्तर पहरावकर**

अंद्रयाला फुला जाम आवड्याशी. लहानपनापासून त्याव तीवर जाम जीव हॉतॉ. ती रोज दोपारा भाटात खपना-या माहनांकरता 'शा' घॅवॉन जाशी, तिगाळा तीला बगिता आला पाय भगून तॉ त्या भाटातशा बावखालात रॉजसॉ मावरा पकड्या जासॉ. पान भाटात जाश्या अगोदर तॉ नंदाखाल देवळा पायरीला हाथ लाव्यासॉ व आजपान एखादॉ भॉठॉ मगर मिळालो पाय भगून देवादरी रोज विनंती क-यासॉ. नंतर तटनेस तॉ देवळापुढशा बटरवाल्या दरी जासॉ व बटर खात खात "शा" डॉक्टरशा दवाखान्यापर्यंत यासॉ.

"शा" डॉक्टरशा दवाखान्यात "शा" मिळयासॉ नाय कारन तॉ डॉक्टर हॉतॉ. "शा" डॉक्टरन्ये जर "शा" विकिलॉसॉ तर तॉ आतेपोत या देशाव पंतप्रधान जालॉसॉ अहा अंद्रया बाबान्ये अंद्रयाला एकदा हांगिलता. तही "शा" डॉक्टरशी ओळख त्याला "शा" डॉक्टरन्ये त्याला टोपनी दिलती तिगाळपासून हाय. 'मस्काबटर' मिन्ये मस्कॉ कडे हाय ई बग्या करता एकदा अंद्र्याने त्या बाबान्ये हाडलॅलॅ चारपाच मस्काबटर फोडलॉतॅ. ता बगॉन त्या बाबान्ये त्याई पाठ फोडलोती आन कंब-यात ठॉसॉ घायलॉतॉ. तीगाळा अंद्र्यान्ये तोंडाव बटर कॅलतॉ . "शा" डॉक्टर कंब-याव बो अस्छाल डॉक्टर हाय अहा अंद्र्या दादयन्ये अंद्र्याला एकदा हांगिलता . अहोंदे ...!

देवळा पायरीला स्पर्श करॉन भॉठॉ मगर मिळ्या पाय अही प्रार्थना केल्योर तॉ निंबरातन्ये सलात सलात तडाक बाठात जासॉ आन फुला याशा अगोदर गरय मांडॉन बॅहासॉ. रॉज त्या गरयला तीन-चार डाकू आन एखाद दुहरॉ मगर लाग्याशे. मग हांच्यापारा फुलाई दादय बाठातन्ये घारा जा लागली गा तॉ पकडलेल्या मिनसॉ भॉठ्यासॉ भॉठॉ मगर फुला दादयला द्यासॉ. फुला दादयला मगर जाम आवड्याशे. त्यात तेल आहात्ये. तेलकाट मगराव सव कय वायलॉस लागात्ये अहा ती कायमशी हांग्याशी !

मग फुलाई दादय घारा गेली गा, त्या मगराये तीन तुकडे क-याशी. मिनशी रई फुलाला, मगराई हेपाट 'तुमे आयकात्या गा' ला (मंजेस फुला बाबाला) आन मगरा डॉखा स्वत:करता ठव्याशी. फुला दादयला मगरा डॉखा सुंब्या जाम आवडात्ये. एकदा मगरा डॉखा ती अहीस बशीत घेत असताना 'तुम्ये आयकात्या गा' न्ये खोकलॉ कॅलतॉ, तॉ तीन्ये लॅमकॉ 'आयकिलतॉ'. तिगाळा तीन्ये त्या मगरा डॉख्याला न सुंबिता भॉठॉ साव मारलोतॉ. त्यानंतर 'तुमे आयकात्या गा' ला जीवताना खोकलॉ जालॅलॉ तीन्ये कत्तेस परत 'आयकिलो' नाय. अहोंदे ..!

त्या दिहा पान अंद्र्या ऑहॉस गरय मांडॉन बॅहलतॉ आन गरयला भॉठॉ मगर लाग्याशी व रस्त्योरन्ये फुला याशी तॉ वाट बग्या लागलोतॉ. ऑड्यात त्याला गरय जाम जड लाग्या लागली. त्याई गरय पाण्यात जोराजोराये खाला खेशीली जा लागली. ता बगॉन गरयला आज जाम भॉठॉ मगर लागलॅ हायदॅ या विसारान्ये त्याला जाम आनंद जालॉ पान तॉ बक्काट जोर लावॉन गरय पाण्यावर खेश्या गॅलॉ तर ऊलटॅ त्यायेस कॉलाटे जाल्ये. तंगडे वर आन डॉखा खाला. त्याई नंदार आकाशात गेली तॅ एक 'भयदिवाड' त्या गरय पासून वॅगळा ऑहॉन वर हवेत ऊडात ऊडात जाताना त्याला दिखला. लॅमकी त्यास

वॅळॅला फुला तडन्ये रस्त्योरन्ये हातात 'शा'सॉ तांब्यो घॅवॉन येताना त्याला दिखली. तॉ पटकान हाताशी गरय टाकॉन तॉहॉस ऊबॉ रॅलॉ.

आज कय पान करॉन फुलापुढॅ आपला मन मॉकळा क-यासा आहा त्यान्ये ठरविलता. फुलान्ये पान तीये केस मॉकळॅ होडलोतॅ. त्यामुळॅ तीला पान मॉकळा मॉकळा वाटात्ये हायदॅ अहो अंद्र्यान्ये विसार कॅलॉ. तडे ता भयदिवाड गरयपासून मॉकळा हॉवॉन वळवळात अंद्र्या माव-या पिशवीत गॅला व तडेस बॅहॅला रॅला. त्या पिशवीत एक डाकू व एक मगर अगोदरपासूनूस वळवाळ करतोते. "फुला ..!" अंद्रयान्ये फुला जवळ आली तही हाक मारली. "बॉल अंद्रया...! "पान पुढॅ का बॉल्यासा ता अंद्र्याला कय सुसात नॉता . "अरे, बॉल गनी ...!" तॉड्यात अंद्र्याई नंदार माव-या पिशवीओर गेली. पटकान त्यान्ये ती पिशवी टुकिली आण तॉ बॉयलॉ, "फुला, म्ये रॉज मावरा पकडॉन तू दादयमार्फत तुपा पोशविर्तॅ. आज तुआस हातात दॅर्तॅ थांब. "अहा हांगॉन त्यान्ये पिशवित हात घायलॉ आन पिशवीसा मावरा समजॉन भयदिवाड बायार काढला. ता भयदिवाड बगता बरोबर अंद्र्यान्ये घाब-याये "बाबों ...!" अही जोराये किकारी फोडली आन ती हातशी पिशवी लांब फॅकॉन दिली. त्यान्ये फुलोर बगीला तर ती जाम रागावलोती. "जाला? तुआ नाटक करॉन जाला गा हांग बास अंद्र्या? तुला का वाटला तुआ ता भयदिवाड बगॉन तुला म्ये घाब-यायॅ वेंग मारन्ये ? अरे हॉडॉन दे... कुपा-या रगात हाय मा मिन्ये. कुना.. ? कुपा-या..! समजाला ना ?" आहा बॉलॉन ती तडन्ये तरतरॅ निगॉन गेली. अंद्रया तीवर बगीतूस रॅलॉ. नंतर त्याई नंदार भयदिवडोर गेली. ता वळवळात वळवळात तोपोत बायीआ कठड्यापोत पॅासलॉता... आपल्या बायकूई परत भेट हॉव्या करता ता पान आतूरलेला होता...!

## भाषा आन म्ये - **निलेश डायस, नानभाट / लंडन**

१९८० ते १९९५ ऑ काळ आमशी जॉन तेविसावे, आगाशी शाळीऑ सुवर्नकाळ हॉतॉ. त्या वेळेला उत्तर वसईमिनॅ इंग्लीश मीडियमशी ई एकूस 'कॉन्व्हेंट स्कूल' होती. शाळा इंग्लीश मीडियम पन शाळीत आमॅ कत्तॅस इंग्लीश बोयला नाय!! आगाशी तॅ गास मीनशॅ कुपारी/वाडवळ आनी विरार तॅ मीरा रोड वरनॅ मराठी, हिंदी, गुजराती, मारवाडी अहॅ वेगवेगळ्यो भाषा बॉलना-याई शाळा 'मेलटिंग पोट' जालती. त्यात आपले कुपारी पोरे संख्येने जास्ती त्यामुळॅ 'आमसा' आनी आपल्या 'कादोडी' भाषेआ तडॅ वर्चस्व हॉता. एक टीचर हॉडॉन आम्हाला कुना हरी इंग्लीश बॉल्यासॉ प्रश्न आलॉ नाय. कॉलेजला सुद्धा मराठी आनी हिंदी मीनॅ बॉलना जास्ती हॉयसा त्यामुळॅ कामाला लागल्योर इंग्लीश वर प्रभुत्व मिळव्यादो बरिस मेहनत क-या लागली. या बॅकग्राउंड मुळॅ जीगाळा आमशा पोरीऑ, लंडनला जन्म जालॉ तीगाळा तीआ हरी कुहन्या भाषेत बोल्यासा ऑ प्रश्न पडलो. आमे घारा कादोडी बोलात्याव पन पोरी नर्सरीला जा लागली गा ईआ का होयदे? ती बरबर कादोडी बोलनारा कून नहनार, तीला आपल्यापेक्षा जास्ती प्रॉब्लम होयदे यायी जानीव होती. त्यामुळे आमॅ तीआ बरबर इंग्लीश, पन आमशा नवरा-बायकु मीनॅ कादोडी बोल्यासॉ निर्नय घेटलॉ. तिला इंग्लीशसॉ इश्यू पन नाय होयासॉ आणि आपल्या कादोडी भाषेइ मायती सुद्धा होयदॅ. आमशी पोरी आज सात वहराइ जाले. इंग्लीश सो प्रश्न नाय आन कादोडी जकला तिला कळातॅ पन ३-४ वाक्यापलिकडे बॉलता मात्री ये नाय. मुंबईला जहा भारताशा कानाकोप-यासा लोक हाय ताहा लंडनमीने जगाशा कानाकोप-यासा लोक येतॅ. तहेस आंतरवंशीय लग्नेपान भरपूर होत्यात त्यामुळे ऑ प्रॉब्लम सगळ्यांना हारकॉस सतावितॅ. माई एक सहकारी फ्रेंच हाय आणि तिऑ नवरॉ ब्रिटीश. त्याइ वेगळॅ पर्याय निवडलॉ. ती पोरा हरी फ्रेंच बोलाते आणि नवरॉ इंग्लीश. पोराला पयलॉ थोडॉ प्रॉब्लम जालो पन आतॅ दोन्ही भाषेत व्यवस्थित संभाषण करतॅ. तीया अनुभवावनॅ आतॅ आमे सुद्धा ईस स्ट्रॅटेजी वाप-या सुरूवात केले. आपल्या वसईमीनॅ सुद्धा आज अहीस परिस्थिती हाय. बरेस पोरे घारा मराठी बोलत्यात. मराठी आनी हिंदी ते नायतरी पुडे बोलनारूस पन या मुळॅ कादोडी एका पिढीत गायब होवू शकाते. जर त्या ऐवजी दोगापैकी एका पालकानॅ पॉरा बरबर कादोडीमिनॅ बॉलना केला आणि दुह-याने इंग्लीशमिनॅ तर कादोडीआ जतान पन होयदॅ आणि इंग्लीशसॉ पन सगळ्यांना करियर मिनॅ फायदॉ होयदॅ. आमशा घरात कादोडी रेली पाय भगुन आमॅ प्रयत्न सालु कॅल्यात...

## भाटात्सा भूत ! तॅआ मायशी... - **बर्नर्ड लोपीस, हाम्बोडी आगाशी**

ऐन वैशाखाऑ वखत. बाइत्सॉ पानी हूकॅसॉ. हिपने तापॅशे. मोटरी मीनजॅ वॉटरपम्प भाटात पॉसलॅ नॉतॅ. लाइट पोसली नोती. जकलॅइ मीळॉन बाव एक आन भागीदार ऑबडॅ. बिशारी कुनाकुनाला हांबळॅशी? हिपने कॅर करतान वारॅ

करॅशॅ. मंजॅ एकेक वार प्रत्यॅकाला वाटॉन दॅसॉ. वार बो मिळालॉ पान आखीरीऑ वखत. बावीत पानीस कमी अहॅसॉ. वारॅआ करतान मारॅ हॉॲशॅ. पान हाकोटे मारॉ आन हांशी सुलय.

आपलॉ वारॉ (वार) खपॅॲ ताव राट सालू रॅसॉ. जकलॉ कारबार बैलाआ जिवोर. हिपना करॅ दोन माहने लागॅशॅ. एक बन्ना वाळॅदो आन एक बैल हाकलॅदो. दिहासा इ काम सॉपा अहॅसा. पान रातसा राटोर बॅहॅसा मंजॅ, बाप रे..!!

खाला काळामस बावखाल. त्यात लाकडी कांडे टाकॉन केलेली बाव. बावीत डॉकॅआ पान घाबरॉ वाटॅसॉ. बांडयो मात्र लांडयो. बिनधास बावीत बुडॅश्यो (उडी मारॅश्यो) आन पानी भरॉन (घॅऑन) वर याश्यो. पॉंदाळात पड्नारॉ पानॅऑ आवाज आन राटाऑ बाराखडीमीनॅ पान लीविता यासॉ नाय अहॉ आवाज यासॉ. दिहासा आयकताना कय वाटॅसा. नाय पान रातसा तॉ आवाज आयकताना काळॉखात कून तरी रडॅआ भॅहॅलॅ आहास वाटॅसा. जॅआ तॅआ तॉंडातनॅ आयकिलेल्यो हेडलन, भुते, धोतीन, बरमॅओ कान्यो नेमक्यो आठवॅश्यो. एकेक शब्द कानात ऑहॉ वाजॅसॉ ना गा अभ्यासाला भुताॲ धडॅ अहलॉशॅ तॅ शाळीत पयलॉ नम्बर आलॉसॉ.

भाटात उजॅडाला जेमतेम एक कंदयो (कंदील) अहॅसॉ. तॉ हिपनारॅआ दरी लागॅसॉ. जकालास तानतॉटॅआ. तॅआ मानानॅ मने मात्र भरलेले. भोटे माहने जाम हिमती. पायात वानॉ बीनॉ घालॅशॅ नखरॅ नॉतॅ. रातसा जैजनवार दिखला तॅ अॅका उपटीत काम फिट. आथात कंदयो आन लाकडाआ दंडुक कायम अहॅसा. जातीऑ कुपारी. एकदा पोनॅइ उटी खोशीली गा कुना बापाला घाबरात नहाता. घाबरॅशॅ फक्त बावीत पानी उपलॅ हायदॅ तॅलास. हिपनॅला उपीलॅलॉ पानी माकून दोनेक तासात ऑहॅसॉ. जॉडॉ जालॅ तॉडॉ उपीलॉ गा थांबॅआ लागॅसा. भैसॉ नातॅ बैलाला तॉडॉस आराम.

हानशापारा राट बंद जालॉ गा रातीत बाव माकून भरॅशी. मंग एकदम काळॉखाय जाऑन हिपना सालू करॅसा. वैशाखात मात्र पातेराती अडीस तीनलास जाआ लागॅसा. बाबा आन भोटे भाहा रातशे भाटात जाशे माला पान जा वाटॅसा. पन मॅ पाशवीत हॉतॉ. दा एक वहराऑ हायनॅ. माला कून नॅनार?

एक दी मॅ हट्ट करॉन बाबाआ आन अन्नाआ हरी गॅलॉ. बाबा हिपॅआ जासॉ आन मॅ अन्ना जोडीला भैसॉ हाकलॅआ राटोरशा फलाटीओर भॅहॅसा आहा ठरला. राटा तीन कॉपरॅआला तीन फलाटी होत्यो. तॅआतशा एकोर रॉज दॉपारसॉ पासूकाका ॲऑन नीजॅसॉ. दुहरी फलाटी आमशी. तॅआओर पोरे परिकशेआ टायमात कतॅ कतॅ अभ्यासाला भॅहॅशे. हुट्टीत आंबॅ, फनस, नाळ (बवतेक आमशास कुनाय तरी सोरलेले अहॅशॅ) पाडॅशे आन तॅॲ वाटॅ हॉॲशॅ. भोटे पोरे कतॅ कतॅ तीन पत्ते खॅळॅशॅ. भॉटा कून आला गा चिल्लर लपवॅशॅ. भॉठ्ठॅव मान ठॉॲशी रीत ओथी. आमे तॉ खेळ बगॅआ ऊबी रॅश्ये. फलाट्यो तहयो मा ओळखीयो ओथ्यो.

रातशॅ अडीसेक वासता अमे भाटात आले. जाम काळोख. भयसॉ पुडॅ. मॅ अन्ना आन बाबा मीनशॅ मीनॅ सलातॉतॉ. अन्ना दरी एक लानी बॅटरी ओथी. ती तॉ गरज पडली तरूस पॅटवॅसॉ. बाबानॅ कंदयो धरलॉतॉ. भयशाला डॉपॅन्ना बांदिला आन भयसॉ झुपीलॉ. राट गानॅ बॉलॅआ लागलॉ. पॉन्दळात बांडयो हॉळॅआ लागल्यो. बाबा कंदयो आन दंडुक घॅऑन हॅजात गॅलॉ. बान्ने काल हानशेस वाळॉन ठविलते. कंदीलाऑ उजेड लाम लाम साल्लॉ तॉहॉ मॅ अन्ना मॅरॅ सरकालॉ.

अन्ना बोयलॉ, “ घाबरलॉ गा का रॅ?”

तॉहॉ मॅ आतमीननॅ घाबारलॉतॉ, पन कुपारीस ना? “मॅ कुनालास घाबरॅ नाय, भुताला बी नाय”.

मॅ इ बोयलॉ खरॉ पान कडशा कडे भुताआ नाव काडला आहा माला जाला.

अन्ना काळॉखात हळुस्कान आहालॉ. “आतॅ तू भॉटॉ जालॉ ABCD तान या लागली आतॅ कदो घाबरॅसा. (तिगाळा पाशवीत इंग्लिश सालू हॉतॉता) अन्नानॅ आवसान दिला. आजूबाजू शांत ओथी. भयसॉ मीनॅस थामबॅसॉ. अन्ना तॉंडाय ‘हय हय’ ‘च्यक च्यक’ ऑहॉ आवाज काडॅसॉ आन भयसॉ सलॅआ लागॅसॉ. माला भयसॉ ‘पासवर्ड’ माइती पडलॉ. भयसॉ ऊबी रॅलॉ गा मॅ पन ‘हय हय’ ‘च्यक च्यक’ करॅसॉ. ..जरा आवसान पन या लागला. पयलीत असताना दॉपारसॉ मॅ यास भयशा पाठीओर वेडे शाने शित्रे काडॅसॉ, तॅआ पाठीओर लॉळॅसॉ. तॅआ गळॅला आटी मारॅसॉ. माॲ विसार सालू हॉतॅ आन अन्ना डॉळॅत नीज. अन्ना रॉज पासशी बस पकडॉन कामाला पान जासॉ.

ऑडॅत हॅजातनॅ बाबाइ हाक आली, “बाssळू!..”

अन्ना बोयलॉ...कडॅतरी बान्ना फुटलॅ वाटातॅ ! हेज लाम ऑथा.

अन्नानॅ विसारला, “तू अॅकलॉ बॅहॅदा गा ? मॅ बगॉन येतॅ पटकान.”

हा हांगॅआ हिम्मत नोती आन नाय बॉलॅआ पान लाज वाटली. “मॅ बॅहॅनॅ, तू जाऑन ये....”

अन्नानॅ बॅटरी पेटविली आन राटोरनॅ डॅवलॉ. बॅटरीऑ उजेड हळू हळू लाम गॅलॉ. तहॉ राटाऑ गानॉ रडनॅ हारकॉ वाटॅआ लागलॉ. बांडयो हॉळॅसॉ आवाज हेडलनी आहात्यात तॉहॉ वाटॅ लागलॉ. भयसॉ सावकाश सलातॉतॉ. मॅ आवसान हाडॅआ करतान नुसतास हय हय कॅला. माऑ पासवर्ड बवतेक सुकलॉ. भयसॉ उबॉ रॅलॉ. जकलॅ आवाज थांबलॅ. काळोख आंगात खीरलॉ. भेंडीए पाने हालातोते तॅऑ आवाज कूनतरी कानात बॉलातॅ ऑहॉ या लागलॉ. मॅ भाटात कडशा कडे आलॉ आहा माला वाटॅआ लागला. अन्ना एकदासॉ येतॅ कतॅ आहा जाला.

मॅ जामूस घाबारलॉतॉ. हादेदॅ ताहा ‘हय हय’ ‘च्यक च्यक’ करतॉतॉ. मा कमांडमीनसॉ वायरस भयसॉ उमजालो वाटातॅ, बिशारॉ सलॅआ लागलॉ. ऑडॅत / तॉडॅत माला भाटा बिदीत एकाएक उजेड दिखॅआ लागलॉ. उजेड मॅरॅ मॅरॅ येतॉतॉ. बावीशा मॅरॅ आलॉ आन बंद जालॉ. माइ गाबोळी फाटली. काकाआ ओट्योर आयकीलेल्यो जकल्यो भुतायो कान्यो पटापट आठवॅआ लागल्यो. पॉहताना बावीत बुडॉन मॅलॅला एक दारुडा आदिवाशी, ता पान नॅमका आठवाला. टुमान भीजॅशी पाळी आली. भयसॉ माकून उबॉ रॅलॉ. मॅ फलाटीला चिकटॉन भॅहॅलतॉ. खाला उतरॉन हॅजात जाशी हिम्मत पान नोती. बावीमॅरशा बावाखालात घुंगुराव आवाज या लागलॉ. नुसतॉस बारीक बारीक उजेड पडॅसॉ आन मिन्नॅस फताक फताक आवाज येतॉतॉ. कून तरी शिकलात सलातॉता.

ऑडॅआ रातसा बावखालात भुताशिवाय सलनार कून? आतॅ आपुन भुताआ आथा हापडॉन मेले ऑस विसार शिल्लक रॅलॉ. अन्नाला गा बाबाला आख मारॅदो माइ फेफरी साप बंद जालती. मॅ जीव वासवॅदो फलाटा वरनॅ उडी मारली आन माव ॲकलॉस जीवंत साथीदार भगून भयशाआ गळॅलास आटी मारली. तॅनॅ डॉपॅनॅतनॅस बवतेक माला ओळखीला माला जाम आदर वाटलॉ.

टाइम कॉडा गॅला माइत नाय अन्ना राटोर आलॉ तिगाळा मॅ भयशा गळॅल आटी मारॉन उबॉ ऑथॉ. आथ पाय थंडॅ पडलॉतॅ. अन्नाला बगॉन माला धीर आलॉ. मॅ हळुस्कन तॅला बावीओर कुनतरी हाय ता हांगीला. अन्ना दाबड्योरनॅ बावीखाला डॉकायलॉ. तॅला पान बारीकसॉ उजेड दिखलॉ. भूत हायदॅ तॅ गाळ दिली गा पळातॅ ऑहॉ समज ऑथॉ.
अन्नानॅ दणदणीत आवाजात, “कून हाय रॅ? तुआ आssssयसा.....” करॉन एक फूल भरला.
बावाखालातनॅ आवाज आलॉ, “मी हाय रं दादा.... बॅड्कं नांगाया आलाव...” आथातशी घुंगुराई दांडी हालविली. उजेडाऑ बाडूक पळात्यात भगून बारीक केलेली कंदिलाई वात भोटी करीत तॅआ आदिवाशानॅ उत्तर दिला.
मा तॉडाआ कालवान करनारॅ भुताआ तॉडातनॅ इ आयकिता खोटी मॅ आन अन्ना खॉखाटॅए अहे आहॅ लागले गा तॅआ आवाजाए उबॉ रॅलॅलॉ भयसॉ पान सलॅआ लागलॉ आन माकून राटाआ गीत सालू जाला. आन बांडयो आहात आहात हॉळॅआ लागल्यो.

---

## राट एक जीवन गानो ... - आलेक्स मच्याडो ७२०८१६१२१३

कय दिहाअगोदर म्ये फेसबुकवर राटाये फोटो बगीलॅ आन मा मन एकदम जुन्या काळात धाव्या लागला. मनाश्या कॉपऱ्यात आठवणीई भरलेली एक टाकी होती, त्या टाकीआ जहा ढाकान निंगाला आन आठवनीआ पान्याव पोंदळ एकदम वाया लागलॉ. राटायो जकल्यो आठवनी डॉळयापुढं या लागल्यो. तिगाळा हाकोटे उठले गा राटाऑ 'कुऽ ईऽ ई…' ऑहॉ आवाज यासॉ. थंडी दिहा हाकुटे राटा समोर भाटास्सा कसरा पॅटवॉन मस्त तापना कॅलॅला अह्यासा. आमी शाळीत जानारे पोरे मग तापन्यामॅरॅ जाश्ये. मस्त हेक लाग्यासॉ, जाम बरा वाट्यासा. दोनू हात तापन्योर धरयाश्ये. तापन्या धॉराला धुरकाट वास यासॉ. त्या वासायेस पॉट भरयासा. आन मग आम्ये शाळीत जादो निग्याश्ये.

दॉपारा शाळीतन्ये परत येताना तॉस 'कुऽ ईऽ ई…' ऑहॉ आवाज परत आयक्यादो यासॉ. सलताना रस्त्यामिनॅस पान्याव दांड लाग्यासॉ. तहास त्या पान्यामिन्ये उतऱ्यासा आन पानी डॉम्बात डॉम्बात सल्या लाग्यासा. दॉपारा टायमात दांडाऑ थंडॉगार पानी पायाला लागलॉ गा जाम बरा वाट्यासा. जाता जाता केळीमिन्ये, तांबड्या लुगड्यामिनशी आम्श्या बाजूशी वयनी हिपना करताना दिख्याशी. हिपन्या पान्यामिन्ये आलॅलॅ पांढरॅ बगळॅ तिला सोबत करयाश्ये. कतॅ कतॅ वयनी आपल्या लुगड्या पदरा टॉक घॅवॉन आपल्ये डॉळॅ पुहीताना दिख्याशी. 'तिला मायारशी आठवण येत्ये हायदॅ गा' मा मनात विसार यासॉ. आन मंग बय जॉ गानॉ बॉल्याशी त्याई एकदम आठवन याशी, 'दुपारचे बारा वाजले आए एकटीच गे मी भाटामध्ये, एक बांदना वाळीतॅ आये तुझीच गे मला याद पडातॅ'. माला मनातश्या मनात जाम वाईट वाट्यासा.

शाळीला हुट्टी हली आन आमसॉ हिपना करयासॉ वारॉ हलॉ गा बाबा आम्हाला लवकर उठ्व्यासॉ. बाबा एका हातामीन्ये बैलाई पाग, दुहुऱ्या हाताये खांद्योर धरलॅलॉ पावडॉ आन बैलामाझे सलनारॉ म्ये ई चित्र माला अजून जहाच्या तहा डॉळयासमोर दिखात्ये.  आम्ये राटोर पोसले गा बाबा बैल राटाला झुप्या लाग्यासॉ. म्ये त्या मॅरॅ उबॉ रॅवॉन बगीत ऱ्यासॉ. राट सुरु कॅलॉ गा मग बाबा मा हातामीन्ये परानी दॅवॉन भाटात जासॉ. आम्श्या राटा बाजूला आंबॉ, फनस, शीस, हॉपारी, बॉखाडॉ, माड अहे कॉडयातरी प्रकारश्ये झाडे होत्ये. त्या झाडायी जहॉ वॅढॉस घायलोतॉ राटाला आन ह्या सगळया झाडोर, तरतऱ्हेश्ये पक्षी आवाज करीत अडन्ये तडे, तडन्ये अडे, अहे उडते रयाशे. म्ये राटा कॉपऱ्यामीन्ये फलाटीवर बॅहॉन ई सगळा बगीत ऱ्यासॉ. डोळयोर डॉपॅना बांदॉन सुद्धा न अडखाळता गोळ गोळ फिरनाऱ्या बैला माला जाम नवाल वाट्यासा. मंग मनात विसार यासॉ आमसॉ बाबा पन ह्या बैला घतीनुस खपात्ये आम्श्या करतान. आम्श्यो चुको दिखल्यो पा नात भगून डोळयोर डॉपॅना बांदॉन आन मॅरदारश्या लॉका बॉलन्या परांडीयो टोसन्यो खात कत्ये कत्ये माला बैला डॉपॅन्या खालश्या बाजूला, डॉळयातन्ये यॅवॉन हाकलॅलॉ पानी दिख्यासॉ. म्ये मनात विसार कऱ्यासॉ, बैल रडात्ये हायदॅ गा ? त्याला जाम त्रास हवात्ये हायदॅ गा ? आमसॉ बाबा पन ऑहॉस मुक्काये रडात्ये हायदॅ गा? माये डॉळॅ पान्याये भरॉन याशे.

एकमेकामीन्ये सॉताला अड्कवॉन घॅवॉन, आपल्या सगळया ताकतीये राटाला आन राटा माळीला फिरविनाऱ्या दात्योरती म्ये कॉडो तरी वखत बगीत रयासॉ. त्यावोर बगोन माला वाट्यासा, दोन बन्दव, नाते दोन मित्र हातात हात घालोन एकमेकाबरोबर काम करया निन्गाल्यात. राट फिरव्यादो ये दाते जाम ताकत लाव्याशे. जॉहो जॉहो बैल राटोरती फेऱ्यो मारयासो तही तही राटाई माळ त्याबरबर गोळ गोळ खालवर फिरती ऱ्याशी. इ माळ ओडी मस्त फिरयाशी कि त्यावरणे डोळेस निन्याशे नात. यो बांड्यो एका मेरने, खाल्श्या बाजूने, बावीमिने उतरयाशो, बवीमीने पोसल्यो ग बुडूक-बुडूक ऑहो आवाज करीत पोटामिने पाणी भरोन घ्याशो आन वरश्या बाजूला निन्याशो. वरती पोसल्यो गा यो बांडयो मान खाला घालोन आपल्या पोटास्सो जकलो पाणी खालश्या पोन्दळामीने ओतोन द्याशो आन तह्योस परत वरती या निन्याशो. आपुन कुनाला का दिला?, कोडा दिला?, यावो कुहुनोस हिशोब न ठविता ! नुसता देत रयासा, बी कुनातरी करतान स्वताला रिकामी करयासा. कते कते या माळीमीने एखादी फुटकी बांडी अह्याशी. ती पण पाणी घेवोन वरती या लाग्याशी. पण येता येता त्या बांडीत्सो पाणी सगळो हॉळोन-गळोन जासो तरी पण ती बांडी वरती आली गा जॉडो हायदे तोडो जमलेलो पाणी पोंदळामिने खाली करोन परत खाला निन्याशी. अह्या टायमाला देवळामीने फादर कते कते त्या गरीब बाईश्या दानाई गोष्ट हांग्यासो त्याई मला आठवण याशी .
पाणी पोंदळात पडलो गा मंग दांडा रस्त्याला लाग्यासो. ज्याकरता तो हाय, त्यापोत तो पोसलो पाय मनून व्यवस्थित दांड केलेलो अह्यासो. ह्या वाह्त्या पाण्यामुळे अख्खा भाट भिजोन निन्यासा. पाणी पेवोन मग मेरदरशे झाडेपाने खुश हव्याशे. सगळो परिसर हिरवो ऱ्यासो.
बैला जुफान खप्याश्या टाय्मोर, बाबा नेमको राटोर यासो, आन बैलाला थांबव्यासो. त्या पाठीवरणे हात फिरव्यासो. मग त्या डोळयोरसा डोपणा आन गळयासा जॉहार काड्यासो. बैलाला खूप मोकळा मोकळा वाट्यासा. फिरोन फिरोन बैला आंग तापलेला अह्यासा. बाबा मंग त्याला राटापुडे हावलीत बांदोन ठव्यासो. मग त्याला खादो दयासा. बाबा मग बैला पाठीवर थोपो मारयासो, बैलाला जाम बरा वाट्यासा. मग तो सगळो थकवो, परांडीयो टोसन्यो बाहोन आख्खा आंग थरथरे हालव्यासो, कानाई फडफड करयासो .
राटाआ ओडया सगळया रडगान्यातने, मंग सगळी वाडी भिज्याशी, भाजी वाड्याशी, फुले निन्याशे, लोन्गरे तयार हव्याशे. पण त्याकरतान कुणाला तरी त्याग करया लाग्यासो. सगळया आठवणीया राट गाड्यातने बायार पडता पडता मनात विसार आलो, आज आपल्या फरगोजीई जी बाग जकली फुलयले त्याकरतान पण कुणतरी बैल जाले हायदे. ओ असनो भोटो समाजावो राट खेश्यादो , कुणेतरी आपल्या पैशायो, शिक्षणायो बांडयो ओतील्यो हाय्ह्यात तिगाळास आपल्या समाजावो प्रगतिओ पोन्दळ वाह्या लागलो .
ई आहास सालू रेवो आपल्या वाडवडला देना
राट ई आपला जगना राट एक जीवन गाना …

## "प्रेम गीत" - **डॅनिअल मस्करणीस, मर्देस-वाघोली**

(वेगवेगळ्या प्रोफेशन मिनसा लोक 'वॅलेंटाईन डे'श्या दिहा आपला प्रेम कहा व्यक्त करद्यात त्याविषयी ई विनोदी कविता)

फेसबुक जोडपा :
तो:तुआ नखा फोटोला पण मिळात्यात १००-१०० लाईक्स, कोडी पोरी तू भारी
ती: चार चार ग्रुपसो ॲडमीन तू, कोडी बोठ्ठी रे तुई जबाबदारी
एकत्र: आज करो अनलिमिटेड चाटिंग, जाली जरी डेटाप्लानशी एक्सपायरी

टीचर जोडपा:
तो: तू हारकी शिक्षिका हली गा एकोणीससो पाढो पण वाटाते सोप्पो
ती: आन तू हारको विद्यार्थी हलो गा आमसो मान वाढाते आपसूक ओबडो
एकत्र: आज सगळा बाजूला सारोन, आपुन सल धडे प्रेमाये गिरवो

राजकारणी जोडपा:
ती: तुमी मन्जे एक उत्तम भारदस्त कायदो, ऐकिला गा तुमे धनी
तो: मे हलो जरी कायदो, तू मात्र त्यायी जालेली खरी अंमलबजावणी
एकत्र: राजकारण रोजसास हाय, सल करोन प्रेम आजशी वेळ लावो सत्कारणी

चर्चमीने कार्यरत हलेला जोडपा
ती: तुमी मंजे फादरने दिलेला एक सुंदर प्रवचन
तो: आन तू मन्जे, त्यास मिस्सात जालेला सुंदर गायन
एकत्र : सल घेवो आज प्रेमावो गानो, करोन देवाला नमन

लेखक जोडपा
तो: तू मंजे एक सुंदर कविकल्पना, पौर्णिमेश्या सांदन्यामिन्शी
ती: आणि तुमी मन्जे त्या कल्पनेला सडविलेलो शब्दावो साज हृदयस्पर्शी
एकत्र: आज आपुन दोघे गाठो सल प्रेमायी वेगळीस उश्शी

शिपवाला जोडपा:
ती: कॅप्टन कून पण हो, माव 'जॅक' बाकी तूस
तो: रेड गाऊन मीने धावात धावात आलेली माई पण ती 'रोज' तूस
एकत्र: कोडेही आले वादळे तरी, आपली 'टायटॅनिक' आज किनाऱ्याला लाग्नारुस

ऑफिसवाला जोडपा:
तो: तू मंजे ऐन 'फायनान्शीअल क्रायसिस'मीने जालेला उत्तम 'अप्रेजल'
ती: आन तू मंजे कय ध्यानी मनी नसताना प्रमोशनसो आलेलो अचानक ई-मेल
एकत्र : आपला प्रेम बाकी खरा, आज जगात हाय बी सगळास फेल

वैतागलेली बायकु
ती: मे कमवोन हाडते तिगाळा बनाते वालायी भाजी आन गराम धान
तो: आला, पण जिव्यादो सव येते, कारण हाडते मे पन गना कालवान
एकत्र: सल, मस्त जीवो, नाका आजश्या दिहा कुहुना नवीन भांडान

## पाणी वासवा जीवन जगवा - **सेलविन रॉड्रिग्ज, पेडी नंदाखाल**

काल राती मे फेसबुकवर "पाणी वाचवा ,जीवन जगवा" यावर एक व्हिडिओ बगीता बगीता माई निज लागली .....आज हकोटे एक स्वप्न बगीला आणि अचानक घाबऱ्या जाग आली ... स्वप्न आह होता कि मा घर्सो पाणी सगळो खापले आणि मे सगळ्या घर पाणी मान्गात फिरते पण मला कुनुस पाणी दे नाय.....सगळ्यांना वाटते कि त्यांश्या घर्सो पाणी खपेदे मनून मला कुनुस देदो तयार नाय .... मग मेइन दुकानात जाते तडे बिसलरी पाणी मांगते तर तो २०० रुपयाला एक बाटली हंगते .... आणि मा दरी तोडे पैसे पण नोत्यात का करेसा कय काळे पण नाय ... आन ओड्यात मला जाग यीते.... तीगाला मनाला विसार पडलो कि आपुन आज काल ज्या प्रमाणात पाणी वापर्त्यात आपलोर भविष्यात अही वेळ आली ते का करेसा....त्यापेक्षा आतेस पाण्याशी काटकाश्रीने वापर केलेलो बरो जेणे करोन आपल्याला भविष्यात पाण्यासो तुटवडो नाय होवेसो... पाणी वाचवेदो आपुन खालसे उपाय करू शकत्यात ......
१ शोवर खाला अंगोल करण्या पेक्षा बाल्दीत पाणी घेवोन अंघोळ करा २ तोंड धोवितानी पाणी पशिंडीत घ्या आणि धोवा ३ बाथरूम मिन्ये फ्लशसो वापर करो नका त्या ऐवजी बाल्दीत पाय तोडो पाणी घ्या आणि टाका ४ कपडे धोवितानी पण पाणी हाम्बलोन वापरा ५ भाटात हिपणा करणाती पाणी हाम्बलोन वापरा ... काही लोकांना भाटासा हिपणा जास्ती महत्व हाय पाणी वाचवण्या पेक्षा बगा " थेंबे थेंबे तळे साचे " पाणी एक जीवन हाय ता जर आतेस हमाबालोन वापरला तर भविष्यात त्यावो तुटवडो जानवेसो नाय..
आणि प्रत्येकाने आहो विसार केलो कि मे एकट्याने आहा करोन पाणी कोडो वासे तो मला मायती हाय ..
तर मग आपुन कतेस पाणी वाचवो सकात नात .... माणून सगळ्याने मनात हाडा आणि आपुन सगळे मिळोन पाणी वाचवो साला

Prashant Demello | CFA | 9527110011
prashant@oasismoney.in

INVESTMENT JUNCTION
OASIS MONEY
FINANCIAL PLANNING SERVICES

"Smart Solution for Everyone"

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Life Insurance | Medi-Claim | Mutual Fund Investment | Land Investment | CAR Insurance |
| Insurance Planning | Retirement Planning | Child Education Planning | Daughter Marriage Planning | TAX Planning |

Shop no 10, Garden View Apt., Virat Nagar, Virar [W] 401303

BASSEIN
Holidays

- Honeymoon Tours -
- Family & Group Tours -
- Cultural & Pilgrimage Tours -
- International Cruise Reservation -
- Hotel, Bus, Car, Air Bookings -



Nixon D'mello
M. 9768715866, 9167216411
sales@basseinholidays.com

**जकल्या ख्रिश्चन बाहा-बेंनींना नाताळश्या हनायो आन नव्या वहारायो हार्दिक शुभेच्छा !!**

जागवा रे, पेटवा रे, चेतवा स्वाभिमान हा...



**जकले पदाधिकारी अन कार्यकर्ते**

# स्वाभिमानी वसईकर संस्था